# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २१३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.२३ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## जेन-झी सोबत कनेक्ट होण्यासाठी भाजपच्या विशेष टीमची घोषणा

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था) - भाजपने जनरेशन-जी म्हणजेच तरुण मतदारांशी संपर्क साधण्यासाठी एक विशेष टीम तयार केली आहे. यामध्ये भाजप अध्यक्ष नितीन नवीन, राष्ट्रीय सरचिटणीस स्मृती इराणी आणि विनोद तावडे यांच्यासह गुजरातचे मंत्री हर्ष संघवी आणि छत्तीसगडचे मंत्री ओ. पी. चौधरी यांचा समावेश आहे. या सदस्यांच्या माध्यमातून पक्ष तरुणांशी थेट संवाद साधून त्यांचे विचार, समस्या आणि अपेक्षा समजून घेईल.

दरम्यान, नितीन नवीन यांच्या अध्यक्षतेखालील नवीन ६५ सदस्यीय राष्ट्रीय टीमची पहिली बैठक दिल्लीतील भाजप मुख्यालयात पार पडली. वंदे मातरम संदर्भात काँग्रेसच्या निर्णयाविरोधात एक ठराव मंजूर करण्यात आला. काँग्रेसच्या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीताचे केवळ दोन परिच्छेद गाण्याच्या निर्णयाचा भाजपने निषेध केला. राजकीय सोयीसाठी किंवा लांगुलचालनासाठी वंदे मातरमच्या आदराशी तडजोड केली जाणार नाही, असे पक्षाने म्हटले आहे. भाजप देशभरात आपला वारसा जपण्यासाठी मोहीम सुरू करणार आहे. नितीन नवीन यांची नवीन टीम आज (२२ ऑगस्ट) सायंकाळी ७ वाजता भाजप मुख्यालयात पंतप्रधान मोदींची भेट घेणार आहे. १७ ऑगस्ट रोजी टीमची घोषणा करण्यात आली.

# भारताची सर्वात मोठी ताकद काय?

## राहुल गांधी यांचा पुण्यात 'झेन-झी'शी संवाद

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम आज (२२ ऑगस्ट २०२६) पुण्यात पार पडला आहे. या कार्यक्रमासाठी काँग्रेसकडून मागील काही दिवसांपासून मोठी तयारी सुरू होती. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काँग्रेसचे दिग्गज नेते पुण्यात ठाण मांडून होते. राहुल गांधी यांचा 'छात्रों की गुंज' हा चौथा कार्यक्रम होता. 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी 'झेन-झी'शी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केलं आहे.

दिल्लीतील 'झेन-झी'च्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांचा हा कार्यक्रम महत्वाचा मानला जात होता. 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी 'झेन-झी'शी संवाद साधत महत्वाचं भाष्य केलं आहे.

''मी आज या ठिकाणी राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही. तरुणांची संख्या ही भारताची मोठी ताकद आहे. मला अनेकदा विचारलं जातं की भारताची ताकद काय आहे? हा प्रश्न विचारल्यावर अनेक उत्तरे मिळतात. कोणी म्हणतं की आपली अर्थव्यवस्था, कोणी म्हणतं की आपलं सैन्य, कोणी म्हणतं की आपली आरोग्य व्यवस्था, तर कोणी कदाचित



आपले लोक असंही म्हणतं. पण भारताची सर्वात मोठी ताकद किंवा सर्वात मोठी संपत्ती काय आहे, याबद्दल माझी भूमिका अगदी स्पष्ट आहे. ७० कोटी भारतीय महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. महिला शक्ती हीच देशाची ताकद आहे'', असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

''महिला या पुरुषांच्या तुलनेत स्वभावतः अधिक संवेदनशील, सौम्य, दयाळू असतात, म्हणूनच माझा ठाम विश्वास आहे की, भारतातील महिला हीच देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे. जेव्हा मी पुरुषांशी बोलतो, तेव्हा महिला प्रामुख्याने तीन चौकटींमध्ये (किंवा भूमिकांमध्ये) पाहिले जाते. त्यांना मुलगी, पत्नी किंवा आई म्हणून पाहिले जाते. आता, पत्नी, मुलगी किंवा आई म्हणून ओळखले जाण्यात काहीच गैर नाही. परंतु हीच तुमची एकमेव ओळख असू शकत नाही'', असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

''मनुस्मृतीने महिलांना तीन चौकटीत बसवलं. महिलांना स्वातंत्र्य नाही, असा मनुस्मृतीचा विचार आहे. महिला कधीच स्वतंत्र राहू नये हा मनस्मृतीचा डाव आहे. मात्र, तुम्ही तुमच्या स्वत:शिवाय दुसऱ्या कोणालाही बांधिल नाही'', अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.

अनेक विद्यार्थीनींनी व्यासपीठावर जाऊन राहुल गांधी यांच्याशी संवाद साधत आपल्या व्यथा मांडल्या आहेत. काही विद्यार्थीनींनी त्यांना आलेले काही धक्कादायक अनुभव देखील सांगितले आहेत. यावेळी राहुल गांधी यांनी एक आकडेवारी सांगत देशातील हिंसाचार, बलात्कार, विनयभंग अशा घटनांची धक्कादायक आकडेवारी सांगितली आहे.

## शाळेत अनधिकृत प्रवेश, अभिजीत दिपकेंसह ६ जणांवर गुन्हा

औसा दि.२२ (प्रतिनिधी)- कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपकेंसह सहा जणांवर औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा परिषद प्रशाला विभाग उर्दू, औसा येथील शाळेत अनधिकृत प्रवेश करुन विद्यार्थ्यांमध्ये बसत चित्रीकरण केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिजीत दिपकेंसह अजिंक्य शिंदे आणि अन्य चार ते पाच अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, २० ऑगस्ट रोजी दुपारी सव्वा एकच्या सुमारास अभिजीत दिपके अन्य काही जणांसह शाळेत गेले होते. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये बसून विविध प्रश्न विचारत शिक्षकांच्या शैक्षणिक आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच शाळेची परवानगी न घेता चित्रीकरण करून ते सोशल मीडियावर प्रसारित केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शाळेतील विद्यार्थी असतानाही दुसऱ्या शाळेचे विद्यार्थी आणून बसवले असल्याचे सांगत दिपकेंनी शाळेची बदनामी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी शिक्षकांना अपशब्द वापरुन, त्यांना निलंबित करण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी सय्यद समशादबानो खैरातअली यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन औसा पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेतील कलम १३२, ३२९ (३), ३५१(२), ३५६ (२) आणि ३ (५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड करीत आहेत. पोलिसांकडून चित्रीकरण, शाळेत प्रवेश करण्याची परिस्थिती तसेच संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत पुढील तपास केला जात आहे.

दरम्यान, औसा शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत खासगी शाळेतील विद्यार्थी आढळून आल्याचा दावा 'स्कूल ठीक करो' अभियानाच्या पाहणीत अभिजीत दिपके यांच्याकडून करण्यात आला आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना पाहणी करताना खाजगी शाळेचे विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात आढळल्याचे सांगितले होतेय यावेळी दिपके यांनी विद्यार्थ्यांसमोरच याबाबत विचारणा केली असता संबंधित विद्यार्थ्यांनी आपण खासगी शाळेत शिक्षण घेत असल्याची कबुली दिल्याचे सांगितले होते. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेच्या आवारात खासगी शाळेचे विद्यार्थी नेमके कशासाठी आणि कोणाच्या परवानगीने उपस्थित होते, असा सवाल उपस्थित त्यांनी केला होता. अशातच आता दिपकेंवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये बसून विविध प्रश्न विचारत शिक्षकांच्या शैक्षणिक आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच शाळेची परवानगी न घेता चित्रीकरण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## दरवर्षी लाखो पदवीधर होतात, पण नोकरी अवघ्या ८ टक्के तरुणांना मिळते; निती आयोगाच्या अहवालात धक्कादायक कारण समोर

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- देशात दरवर्षी पदवीधरांची संख्या विक्रमी वेगाने वाढत असली, तरी प्रत्यक्षात शिकलेल्या विषयानुरूप नोकरी मिळणाऱ्या तरुणांचे प्रमाण अवघे ८.२५ टक्के असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. निती आयोगाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'रीइमॅजिनिंग स्किलिंग फॉर विकसित भारत २०४७' या अहवालात ही आकडेवारी मांडण्यात आली असून, देशातील बेरोजगारीपेक्षाही 'शिक्षण आणि उद्योगजगताची गरज' यातील तफावत अत्यंत गंभीर वळणावर पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पीय आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ चा संदर्भ देत निती आयोगाने म्हटले आहे की, उच्च आणि तांत्रिक शिक्षण प्रणालीमध्ये शिकवले जाणारे विषय आणि बाजारातील प्रत्यक्ष मागणी यात ताळमेळ राहिलेला नाही. अनेक संस्थांमधील अभ्यासक्रम कालबाह्य झाले असून पदवी किंवा प्रमाणपत्रे मिळूनही तरुणांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्यांचा प्रचंड अभाव दिसून येत आहे.

देशात पदवी अभ्यासक्रमासाठी नोंदणी केलेल्या ३.४ कोटी विद्यार्थ्यांपैकी एकट्या बीए शाखेत १.१३ कोटी विद्यार्थी आहेत; तर बीकॉम आणि बीएससी या पारंपरिक शाखांमध्ये तब्बल दोन कोटींहून अधिक तरुण शिक्षण घेत आहेत. मात्र या पदव्या थेट रोजगार मिळवून देण्यात पूर्णपणे अपयशी ठरत आहेत.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काही दिवसांपूर्वी 'द इंडियन एक्स्प्रेस'ला दिलेल्या मुलाखतीत या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले होते. ''आपले प्रचलित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना ना नोकरीसाठी तयार करतात, ना उद्योजक बनण्यासाठी,'' अशी परखड टिप्पणी त्यांनी केली होती.

## जनगणना चुकीच्या पद्धतीने, ओबीसींचा खरा आकडा समोर न आणण्याची सरकारची खेळी; ओबीसी संघटना आक्रमक

नागपूर दि.२२ (प्रतिनिधी)- दर दहा वर्षांनी होणारी जनगणना यंदा केंद्र सरकारकडून १५ वर्षांनी करण्यात येत आहे. दोन टप्प्यात याचे काम करण्यात येत असून पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले. आता प्रत्यक्ष जनगणना होणार असून हिमाच्छादित क्षेत्रात याच वर्षी करण्यात येणार आहे. तर पुढील वर्षी इतर राज्यांत होईल. सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचे जाहीर केले होते. परंतु आता अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता इतर जातींची स्वतंत्र नोंद करण्यात येणार नसल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे ओबीसींमधील जातींचा नेमका आकडा समोर येणार नाही.

यापूर्वी सामाजिक, आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले होते. ही पद्धत चुकीची असून यात त्रुटी असल्याचे केंद्र सरकारने मान्य केले आहे. यावेळीही तशीच पद्धत राबविण्यात येत आहे. ओबीसींची खरी माहिती लपविण्यासाठी चुकीची पद्धत राबविण्यात येत असल्याने ओबीसी संघटना आक्रमक झाल्या असून सकल ओबीसी महामोर्चाने आंदोलनाची भूमिका घेतली आहे. ओबीसींच्या जातींचा स्वतंत्र रकाना उपलब्ध करून देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात येणार असल्याची माहिती सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२०११ ला सामाजिक,आर्थिक जात सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यावेळी एससी, एसटीच्या जातींचा उल्लेख होता. तर इतरांच्या जातींचा उल्लेख नव्हता. त्यामुळे त्यांना आडनावावरून आणि लोकांनी सांगितल्यानुसार जातीचा उल्लेख करण्यात आला. यात प्रगणकांकडून जातींचे नाव लिहितांना मोठी चूक केली. केरला राज्यातील मप्पिलास जातीची मोजणी ४० वेगवेगळ्या जातीत झाली. त्याच प्रमाणे महाराष्ट्रात पवार आणि पोवार यांचा ओबीसीत समावेश करण्यात आला. तर या दोन्नही जाती वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे राज्यात ४ लाख २६ हजार ७६६ जातींची नोंद झाली. या सर्वेक्षणात अनेक चुका झाल्याचे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्राच्या माध्यमातून मान्य केल्याची माहिती उमेश कोर्राम यांनी दिली.

यावेळी करण्यात येत असलेल्या जनगणनेत तशीच पद्धत उपयोगात आणण्यात येणार आहे. एससी व एसटी वगळता इतर जातींचा उल्लेख एकाच ठिकाणी होणार आहे. त्यामुळे ओबीसींच्या खरी लोकसंख्या समोर येणार आहे. कारण यात खुल्या वर्गातील जातींचाही समावेश असले. त्यामुळे ही पद्धत चुकीची असल्याचे कोर्राम म्हणाले. एससी, एसटी प्रमाणे ओबीसींच्या जातीची नोंद यात झाली पाहिजे, असे ते म्हणाले. केंद्र व राज्य सरकार ओबीसींच्या मतांवर निवडून आल्याचे सांगतात. परंतु ते ओबीसींचे मारक असून मोठे नुकसान करीत आहे, असेही ते म्हणाले.

कोर्राम यांनी सांगितले की, ओबीसींच्या जनगणनेसाठी १ सप्टेंबरला देशव्यापी आंदोलन करण्यात येईल. आमरण उपोषण, रास्ता रोको, धरण आंदोलन जिल्हा, तालुका स्तरावर करण्यात येतील. या आंदोलनाची रुपरेषा ठरविण्यासाठी २५ ऑगस्ट रोजी मुंबईतील यशवंतरव चव्हाण सेंटरमध्ये राज्यस्तरीय ओबीसी व व्हीजेएनटी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक होणार आहे. ओबीसींच्या मागणीला काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही पाठिंबा दिल्याचे त्यांनी सांगितले.

## केंद्र सरकारकडून १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- सणासुदीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच सर्वसामान्य ग्राहकांना महागाईचा फटका बसू नये यासाठी केंद्र सरकारने आता मोठं पाऊल उचलले आहे. वाढत्या किमती आणि घटत चाललेल्या पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता सुधारण्यासाठी सरकारने १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे.

गेल्या दोन महिन्यांत साखरेच्या दरात सुमारे ४० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. असे असतानाच हा निर्णय घेण्यात आला असून सर्वसामान्य नागरिकांना यामुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. सणासुदीच्या काळात देशांतर्गत मागणी पूर्ण करणे आणि बाजारातील किमतींवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने सरकारने हे पाऊल उचलल्याचे बोलल जात आहे.

सणासुदीच्या दिवसांपूर्वी साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने गुरुवारी एक अधिसूचना जारी करून, कच्च्या साखरेच्या आयातीवरील शुल्क मर्यादा तात्पुरती हटवली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून साखरेच्या किमती सातत्याने वाढत होत्या. ऑगस्टच्या सुरुवातीला, किरकोळ साखरेचे दर ४८ ते ५० रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचले होते, तर घाऊक दर ४,७५० ते ४,८०० रुपये प्रति क्विंटलच्या दरम्यान होते.

## माझा निर्णय कायद्याच्या चौकटीत, सुप्रीम कोर्ट योग्य निर्णय देईल

### शिवसेना पक्ष-चिन्हाच्या वादावर राहुल नार्वेकरांची प्रतिक्रिया

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत पडलेली उभी फूट आणि त्यानंतर मूळ पक्ष व धनुष्यबाण चिन्ह यावर सुरू असलेला कायदेशीर लढा आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांनी बहुमताच्या आधारावर शिंदे गटाच्या बाजूने कौल दिल्यानंतर, उद्धव ठाकरे गटाने याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तिथे ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल जोरदार युक्तिवाद करत आहेत. या संपूर्ण पार्श्वभूमीवर आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात केल्या जाणाऱ्या युक्तिवादावर भाष्य करताना नार्वेकर म्हणाले की, ''जे लोक निवडणूक आयोग किंवा माझ्या निर्णयाशी सहमत नाहीत, त्यांना न्यायालयात याचिका दाखल करण्याचा आणि तिथे युक्तिवाद करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मात्र, कोर्टात केवळ एका बाजूने युक्तिवाद झाला म्हणजे तोच कोर्टाचा अंतिम निकाल ठरत नाही. आता एका बाजूने युक्तिवाद झाला आहे, लवकरच दुसरी बाजूही आपले म्हणणे मांडेल. त्यानंतर सर्व तथ्ये आणि परिस्थिती तपासूनच सर्वोच्च न्यायालय आपला अंतिम निर्णय देईल.''

विधानसभा अध्यक्ष म्हणून आपण दिलेल्या निकालाचे नार्वेकरांनी समर्थन केले. ''मी जो काही निर्णय दिला आहे, तो अत्यंत शाश्वत आणि पूर्णपणे कायद्याच्या चौकटीत राहूनच दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व निकषांचे पालन करूनच तो निर्णय घेण्यात आला होता. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने यावर अधिक भाष्य करणे योग्य ठरणार नाही,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कायदेशीर लढ्याबाबत बोलताना नार्वेकर पुढे म्हणाले की, विधीमंडळ सचिवालयाने या संपूर्ण प्रक्रियेत जे काही कामकाज केले आहे, त्याची सर्व सविस्तर माहिती आणि कागदपत्रे सर्वोच्च न्यायालयाकडे आधीच उपलब्ध आहेत. त्यामुळे दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर येणाऱ्या काळात न्यायालय यावर योग्य आणि कायदेशीर निर्णय देईल, याची मला निश्चित खात्री आहे.

## 'नीट' परीक्षा राज्य सरकारमार्फत घेण्याचा प्रस्ताव पंतप्रधानांना देणार-मंत्री राधाकृष्ण विखे



अहिल्यानगर दि.२२ (प्रतिनिधी)- 'नीट' परीक्षेच्या माध्यमातून जे प्रश्न निर्माण होत आहेत, त्याबद्दल आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक वेगळा प्रस्ताव देणार आहोत. या परीक्षाच राज्य सरकारने घ्याव्यात अशी मागणी प्रस्तावद्वारे आपण करणार आहोत, असे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी आज, शनिवारी नगरमध्ये बोलताना सांगितले.

राज्य सरकारने 'नीट'ची परीक्षा घेतल्यामुळे दोन फायदे होतील, शासकीय महाविद्यालय व अनुदानित महाविद्यालय यांची जबाबदारी वाढेल, गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे लागेल. त्याचबरोबर कोचिंग क्लासेसच्या नावाखाली समाजात जी लूट सुरू आहे, जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे, ती थांबेल, असे सांगताना मंत्री विखे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमावर जोरदार हल्लाबोल केला. मंत्री विखे म्हणाले कॉक्रोच जनता पक्षाच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर 'छात्रो की गुंज' असे उपक्रम हाती घेऊन राहुल गांधी स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्याचे काम करत आहेत. लोकसभेमध्ये सलग तीनवेळा पराभव झाल्याने आणि जनतेतील त्यांची प्रतिमा खराब झाल्यानेच राहुल गांधी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा उपयोग करून घेत आहेत, असा आरोपही त्यांनी केला. 'नीट' परीक्षा आज होत आहेत का? परंतु विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा उपयोग स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी राहुल गांधी करून घेत आहेत. यापूर्वीही सरकार आले, त्यावेळी ते झोपले होते का?, आत्ताच यांना या गोष्टी कशा सुचतात, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा ते उपयोग करून घेत आहेत, असा टोला विखे यांनी लगावला.

## नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात संधी मिळण्याचे १०० टक्के चान्सेस; शिंदेंच्या शिवसेनेचे परभणीचे खासदार बंडू जाधव यांचा दावा

परभणी दि.२२ (प्रतिनिधी)- केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार होणार असून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील मंत्र्यांची संख्या वाढणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यामध्ये, खासदार ओमराजे निंबाळकर आणि परभणीचे खासदार संजय बंडू जाधव यांचे नाव आघाडीवर असून फुटीर खासदारांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडणार असल्याचे समजते. त्याच पार्श्वभूमीवर विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना खासदार बंडू जाधव यांनी मंत्रिपद मिळणार असल्याचे म्हटले.

शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे येत्या ३० ऑगस्ट रोजी परभणी दौऱ्यावर असून परभणीत त्यांचा शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती परभणीचे खासदार संजय जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जाधव यांनी सध्या सुप्रीम कोर्टात सुरू असलेली सुनावणी, उद्धव ठाकरे यांच्या गटाकडून सहा खासदारांना मिळालेली नोटीस, केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार, परभणीचा विकास निधी आणि डिफेंडर गाडी घेतल्याची चर्चा जिल्ह्यात आहे, या सर्व प्रश्नांना उत्तर दिली आहेत..

परभणीत शेतकरी शिवसैनिक संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आल आहे या माध्यमातून एकनाथ शिंदे हे परभणीतील सर्व शिवसैनिक शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत काही अडीअडचणी आहेत विकास कामांचा विषय जाणून घेऊन कार्यकर्त्यांना ते या मेळाव्याच्या माध्यमातून बळ देणार आहेत, असे बंडू जाधव यांनी सांगितले. तसेच, अडचणीत सापडलेल्या कार्यकर्त्यांच्या नेत्याच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणजे एकनाथ शिंदे आहेत. त्यामुळे परभणी शहराच्या आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची आपल्याला गरज आहे, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार मला माहिती नाही, मोदी साहेबांना विचारा, केंद्राने विस्तार केंव्हा करावा हे भाजपाचे नेते ठरवतील. केंद्राने विस्तार ठरवला आणि माझ्या पक्षाने माझं नाव सुचवलं तर मला संधी मिळेल, सुचवलं किंवा नाही सुचवलं तरी मी चिंता करत नाही. मला संधी मिळण्याचे चान्सेस १००% आहेत, असे मला वाटते, असेहीयावेळी बंडू जाधव यांनी म्हटले. आमच्यात जेवढे आहेत तेवढ्यांना सगळ्यांनाच वाटते, आमच्या ओमराजेंना वाटते, आमचे जुने बारणे आप्पा आहेत त्यांनाही वाटते, मलाही वाटते. हे वाटणे साहजिक आहे मात्र द्यायचे का नाही द्यायचे हे नेत्याच्या हातात असते, असे स्पष्टीकरणही त्यांनी पुढे दिले. तर, आम्हाला नोटीस आल्याचा विषय पार्टी बघेल, पार्टीने वकील लावलेले आहेत, त्यांना नोटीस दिली असेल तर मलाही आली असेल. मात्र, जेव्हा आम्ही हा निर्णय घेतला तेव्हा या सगळ्या गोष्टींना फेस करायचा आहे हे विचार करूनच घेतलेला आहे, असे जाधव यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे पोलीस पथकातील श्वानांची निवृत्तीनंतरची तगमग थांबणार

### निवृत्तीनंतर आता श्वानाला पोलीस दलातच राहता येणार

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- श्वान पथक म्हणजे पोलीस दलाचा महत्त्वाचा घटक. गुन्ह्यांचा तपास असो किंवा स्फोटकांचा शोध आणि बचाव मोहीमांत श्वान सगळ्यात पुढे असतो .पण दहा वर्षांनंतर निवृत्त होताच, या श्वानाला पोलीस दल सोडावे लागते. अगदी लहानग्या वयापासून पोलीस दलातील सांभाळ करणाऱ्या रखवालदारापासून अनेकांचा लागलेला लळा सोडवताना या मुक्या शिलेदारांची अवस्था सैरभैर होते. तो क्वचितच निवृत्तीनंतर मिळणाऱ्या पालकांकडे रमतो.... पण या मुक्या शिलेदारांला आता पोलीस दलातच कायमस्वरूपी राहता येणार आहे. या श्वानाची निवृत्तीनंतरची तगमग आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका संवेदनशील निर्णयामुळे थांबणार आहे.

पोलीस श्वान पथकातील निवृत्त होणाऱ्या या श्वानांच्या या परिस्थितीतबाबत एक अहवाल सादर केला. असा श्वान केवळ ६ ते ९ आठवड्यांचा असताना पोलीस दलात दाखल होतो. या दरम्यान अनेक आव्हानांत्मक आघाड्यांवर हा श्वान पोलीस दलाचा वाटाड्या ठरतो. अगदी स्फोटकांना शोधून काढण्यापासून ते गुन्हेगारांचा माग काढण्यात हा श्वान जीवतोड मेहनत करतो. अनेक जोखमीच्या ठिकाणी तसेच अमली आणि नशिले पदार्थ शोधून काढण्यासाठी श्वानांची मदत घेतली जाते. यामुळे कित्येक शोधमोहीमा यशस्वी करण्यात आणि दूर्घटनास्थळी या श्वानांची कर्तबगारी यशस्वी ठरली आहे. अतिरेक्यांना रोखण्यासाठीची जाँबाज कारवाई ते दूर्घटनेतील ढिगाऱ्यांखाली अडकलेल्या निष्पापांचा जीवांचा ठावठिकाणा शोधण्यात हे मुके शिलेदार प्रामाणिक आणि अथकपणे कर्तव्य बजावत आहे आहेत

पण या श्वानांसाठी पोलीस दलातील सेवाकाळ १० वर्षांचा निश्चित करण्यात आला आहे. या काळात प्रशिक्षणासह, त्याच्या देखभालीसाठी पोलीस कर्मचारी नियुक्त केले जातात. या रखवालदार पोलीस कर्मचाऱ्यांशी या श्वानांचे जिव्हाळ्याचे भावबंध जुळतात. श्वानाचा दहा वर्षांचा सेवा काळ संपल्यानंतर त्याला सन्मानपूर्वक सक्षम अशा ठिकाणी दत्तक देण्याची कार्यपध्दती अवलंबली जाते. पण अशा पालकांकडे गेल्यावरही या श्वानाने पोलीस दलातील त्याच्या अधिकारी - रखवालदार कर्मचारी यांच्या विरहात अंतिम काळात अन्नत्याग केल्याचे निदर्शनास आले आहे.

या अहवालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृह विभागाला तातडीने निर्देश दिले आहेत. पोलिस दलासाठी अशी दहा वर्षे अथकपणे आणि स्वामिनिष्ठ सेवा दिल्यावर त्याचे असे हाल होणे योग्य नाही. तो श्वान असला तरी त्याची काळजी आपणच घेतली पाहिजे. अशा श्वानाला निवृत्तीनंतरचे जीवन देखील आनंदात आणि त्याचे कर्तबगारीचा घर असलेल्या पोलीस दलातच घालवता येईल अशी व्यवस्था करण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे आता पोलिस श्वान निवृत्त झाला तरी पोलिसांसोबतच राहणार आहे.

त्यामुळे पोलिस विभागातून १० वर्षांची सेवा बजावल्यानंतर हा श्वान निवृत्त होईल. पण, त्याच्या निवृत्तीपश्चात सुद्धा तो पोलिस दलासोबतच राहील अशी तरतूद केली जात आहे. यामुळे त्याच्या रखवालदारासोबत त्याचे असलेले ऋणानुबंध कायम राहतील आणि त्याचे उर्वरित आयुष्य सुखकर होईल. या श्वानाच्या आहारासाठी आणि देखभालीसाठींचा खर्च गृह विभागाला करता येणार आहे

अशा श्वानांनी पोलीस दलासाठी पर्यायाने जनतेच्या हितासाठी दिलेली १० वर्षांची सेवा बजावल्यानंतर त्यांचे उर्वरित आयुष्य केवळ एक ते दिड वर्षच शिल्लक राहते. त्यामुळे अशा श्वानांच्या निवृत्ती पश्चात त्याच्या मृत्युपर्यंत तसेच या दरम्यान आहार, आरोग्य आणि आवश्यक देखभालीसाठीची आर्थिक तरतूद आता पोलीस दलाकडून करण्यात येणार आहे. निवृत्तीपश्चात श्वान पोलिस दलासोबतच राहील्याने त्याचे उर्वरित आयुष्य सुखकर होणार आहे. त्याचे रखवालदारासोबतचे ऋणानुबंध कायम राहणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयामुळे पोलिस दलाचा अविभाज्य घटक असलेल्या श्वान पथकांतील या मुक्या शूर शिलेदारांच्या उर्वरित आयुष्याची योग्य आणि सन्मानाजनक काळजी घेतली जाईल असे नमूद करून प्राणीप्रेमी आणि श्वान प्रेमींनी या संवेदनशील निर्णयाचे स्वागत केले आहे.

## राज्यात कुठे पावसाची विश्रांती कायम, तर कुठे माध्यम स्वरूपात कोसळणार; विभागाचा अंदाज

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या बहुतांश भागात पावसाने पुन्हा ब्रेक घेतल्याचे चित्र आहे. ऑगस्ट महिन्याचा अर्ध्याहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतरही अद्याप राज्यातील अनेक भागांत शेतीस पूरक असा समाधानकारक पाऊस झालेला नाही. ऐन श्रवणात अपेक्षित असलेल्या पावसानं अचानक दांडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अशातच हवामान विभागाच्या अंदाजानुसार आगामी काळात राज्याच्या काही भागांत मान्सूनचा जोर पुन्हा वाढ आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील तीन दिवस पावसाचा अंदाज वर्तवला आहे. कोकण आणि विदर्भात मान्सूनचा पाऊस अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे, तर इतर भागांतही हलक्या पावसाचा अंदाज आहे. आज दक्षिण कोकण आणि गोवा जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

तर दुसरीकडे विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ भंडारा, गोंदिया, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूरमध्ये काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने या संदर्भात यलो अलर्ट दिला असून नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन केलं आहे.

दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही ठिकाणी पुढील तीन दिवसात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. यामध्ये पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, कराड, मिरज, पंढरपूर, इचलकरंजी, बारामती, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नांदेड, लातूर, जालना, परभणी, बीड, धाराशिव (उस्मानाबाद), हिंगोली, उदगीर, अंबाजोगाई आणि परळी या ठिकाणांचा समावेश आहे.

# घराघरांत मूल्यशिक्षणाची गरज

मानवाला अशक्य असे काहीही नाही, एवढी कामगिरी आधुनिक तंत्रज्ञानाने करून दाखवली आहे; परंतु तरीही मानव असुरक्षित आहे, कारण कमावलेल्या शक्ती-सामर्थ्यांबरोबर त्याच्याशी सुसंगत अशी मानवता, संस्कार जपणारी योग्य मूल्ये जोपासली गेलेली नाहीत. कारण, ढासळलेली मूल्ये त्या प्रगतीला गालबोट लावतात. म्हणूनच आज घराघरांतून मूल्यशिक्षण देण्याची गरज आहे.

'तू फक्त शाळेबाहेर भेट.. मग दाखवतो तुला.. माझे नाव सांगतोस काय? सांगून दाखव बरं.. अन्या मुलाला त्रास द्यायचा नाही हं. सांगून ठेवतो.. तो आमच्या ग्रुपचा आहे. ध्यानात ठेव, माझ्या नादाला लागू नको.. तुला माहीत नाही, माझी पोहोच काय आहे ते?' अशी मुक्ताफळे रुबाबदार तोंयासह भारदस्त आवाजात विद्यार्थ्यांच्या तोंडून बाहेर पडतात. जणू कोणत्या तरी गँगस्टरच्या अड्ड्यावर बसल्यासारखे वाटते. अनैतिकता, अराजकता, आतंकवाद, अवैध धंदे, भ्रष्टाचार, खून, चोरी, वाईट व्यसन, बलात्कार.. यासंदर्भातील बातम्या रोजच आढळतात. आजूबाजूला घडर्णाया या घटना अल्पवयीन मुलांवर परिणाम घडवून आणतात. त्यांच्या वर्तणुकीतून ते दिसून येते. गुंडागर्दी करणे, बळाचा वापर करणे, अपशब्द वापरणे, यांत मुलांना काही चुकीचे वाटत नाही, कारण सभोवताली तेच त्यांना दिसून येते. आज माणूस मूल्यांपासून दूर जाताना दिसत आहे. म्हणून म्हणावेसे वाटते, 'अरे माणसा माणसा, कधी होशील तू माणूस'.

आजच्या गतिमान युगात व धावपळीच्या जीवनशैलीत मानवी जीवन गुरफटलेले आहे. अध्ययन करणारा विद्यार्थीसुद्धा त्याला अपवाद नाही. मोठय़ांच्या यांत्रिक व्यवहाराबरोबरच शालेय विद्यार्थ्यांचे जीवन यांत्रिक स्वरूपाचे झालेले आहे. विद्यार्थी जीवनातील वय संवेदनशील असते. आज अवघ्या विश्वाची झपाटय़ाने प्रगती होत असताना आधुनिकीकरणामुळे मानवी जीवनाची संस्कृती पूर्णपणे बदललेली आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरातील वडीलधारी माणसे व लहान मुले यांच्यामध्ये फारसा संपर्क उरलेला नाही. कुटुंबातील पती-पत्नी नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडत आहेत. या सर्व वातावरणाचा परिणाम मुलांवर होत आहे.

आजच्या आधुनिक युगात मानवाच्या गरजा वाढत आहेत. त्या गरजा पुरविण्यासाठी त्याची चालू असलेली धडपड आणि या धडपडीच्या प्रवाहात तो सापडत असल्यामुळे आवश्यक तेवढा वेळ मुलांना देता येत नाही. मुलांच्या जीवनाकडे, जडणघडणीकडे पाहणे त्यांना अशक्य होत आहे. मानवाला अशक्य असे काहीही नाही, एवढी कामगिरी आधुनिक तंत्रज्ञानाने करून दाखवली आहे; परंतु तरीही मानव असुरक्षित आहे, कारण कमावलेल्या शक्ती-सामर्थ्यांबरोबर त्याच्याशी सुसंगत अशी मानवता, संस्कार जपणारी योग्य मूल्ये जोपासली गेलेली नाहीत. त्याची आज गरज आहे. नुसती प्रगती महत्त्वाची नाही, तर तिला मूल्यांची जोड असणेदेखील अत्यावश्यक आहे, कारण ढासळलेली मूल्ये त्या प्रगतीला गालबोट लावतात. म्हणूनच आज घराघरांतून मूल्यशिक्षण देण्याची गरज आहे.

मूल्य म्हणजे मानवाच्या सदाचारपूर्ण वर्तणुकीची तत्त्वे होत व मूल्यशिक्षण म्हणजे, संस्कार संक्रमणाचे कार्य होय. आजची मुले उद्याचे भावी नागरिक आहेत. भावी नागरिक सुजाण व संस्कारक्षम असला पाहिजे, यासाठी शाळेतून मूल्यशिक्षण रुजवायला हवे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, साने गुरुजी अशा थोर व्यक्ती मूल्यशिक्षणातूनच घडलेल्या आहेत. त्यांच्या विचारांची कास धरूनच आपल्याला भावी नागरिक घडवायचे आहेत.

शिक्षकाने मूल्यशिक्षणाची गरज ओळखून आपल्या विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक, प्रेरक बनावे. शिक्षकाने मूल्यांचे झाड होऊन आधी स्वत:ला रुजवायचे, नंतर विद्यार्थ्यांत त्याची बिजे पेरायची, तरच खऱ्या अर्थाने मूल्यशिक्षण जोपासले जाईल.

# तरुण पिढीतील वाढती व्यसनाधिनता : एक चिंतन!

व्यसन म्हणजे कुठल्याही गोष्टींची वाईट सवय लागून माणसाचे मन त्यातच आनंद मानून पूर्णपणे त्या गोष्टींच्या आधीन होतो आणि त्याला आपल्या जबाबदारीचीसुद्धा जाणीव राहत नाही. त्यामुळे अधिकच एकाकी होऊन तो त्या व्यसनाच्या पूर्णपणे आहारी जातो. त्याचे दुष्परिणाम त्या व्यसनाधीन माणसासोबत याच्या कुटुंबालादेखील भोगावे लागतात.

दारूच्या वाढत्या व्यसनाधीनतेस काहीअंशी संबंधित सरकार सुद्धा जबाबदार आहे. कारण त्याद्वारे प्रचंड प्रमाणावर महसूल मिळत असल्यामुळे त्याला प्रतिबंध न करता दारूच्या दुकानांच्या संख्येत व त्यांच्या वेळेत वाढ याद्वारे एकप्रकारे प्रोत्साहनच देत आहे. तंबाखूच्या व्यसनाबाबत पूर्वीसारखे घरोघरी बिडय़ा/सिगारेट ओढणारे किंवा तंबाखू खाणा-यांचे प्रमाण कमी दिसत असले, तरी तंबाखूमिश्रित गुटखा-खर्रा खाणा-यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे कॅन्सरसारख्या रोगाच्या रुग्णाची संख्या पण वाढत आहे.

तसेच ड्रग्ज व इतर मादक पदार्थाचे सेवन करण्यात दिवसेंदिवस वाढ होत असून तरुण पिढी त्याच्या आहारी जात आहे. त्यादृष्टीने सरकारद्वारे केलेले कायदे व प्रयत्न निष्फळ ठरताना दिसत आहेत, ही चिंतनीय बाब आहे. जुगाराच्या व्यसनाचे दुष्परिणाम सर्वानाच ज्ञात असले, तरी जुगार किंवा पत्ते खेळण्याचे व्यसन असणा-यांची संख्या वाढतीच आहे. मनोरंजनाच्या साधनाचा अतिरेकी वापर याचे व्यसन तर आज चहाच्या व्यसनासारखे सर्वमान्य होत आहे. दुरदर्शन (टीव्ही) व त्यावर दाखविण्यात येत असलेल्या चॅनेलची वाढती संख्या आणि अहोरात्र प्रसारित होणारे कार्यक्रम पाहण्यात अगदी खेडय़ापाडय़ांपासून अनेक कुटुंबातील सभासद आपापले कामाचे आवश्यक तास वगळता आपला बहुतेक वेळ घालवतात. मोबाईलच्या वाढत्या संख्येने व त्याकरिता लागणारे इंटरनेट मोफत किंवा अगदी अल्प दरात उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांपासून वयस्कर लोकांपर्यंत बहुतेक लोकांना या व्यसनाने विळखा घातला आहे. शैक्षणिक किंवा इतर विधायक कार्याऐवजी मनोरंजनाकरिताच मोबाईलचा जास्त वापर होत आहे. या व्यसनाची व्याप्ती इतकी वाढत आहे की, आज सार्वजनिक ठिकाणी आणि घरी प्रत्येकजण आपापल्या मोबाईलमध्येच व्यस्त झालेला दिसत आहे. आजच्या काळात मोबाईलचा वापर अपरिहार्य झाल्याने व सोबतच सरकारचे प्रोत्साहन असल्यामुळे मोबाईल वापरणा-यांच्या संख्येत वाढ होऊन अनेक लोक व्यसनाधीन होत आहेत. मनुष्य आपल्या जीवनामध्ये भरपूर आनंद मिळावा व जमेल तितकी मौज अनुभव करण्यास मिळावी त्या मनोवृत्तीचा असल्यामुळे तो त्याला जमेल आणि पटेल त्या मार्गाने आपल्या जीवनातील निरसता दु:ख आणि ताण कमी करण्यासाठी विविध मार्गाने अविवेकी व अतिरेकी वर्तन करून व्यसनाधीन होत आहे. त्यावर सर्वच स्तरावरून अनेक उपायही योजले जात असले, तरी व्यसनाधीनता ही वाढतच आहे. त्या व्यसनाच्या आहारी कितपत जावयाचे, हे सर्वस्वी प्रत्येक व्यक्तीच्या कणखर मानसिकतेवरच अवलंबून आहे.

# भाजपाच्या गडावर प्रशांत किशोरांचा उदय

**बिहारमध्ये** गेली तीस वर्षे भाजपाचा गड असलेल्या आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन यांना चार टर्म निवडून देणाऱ्या बांकीपूर विधानसभा मतदारसंघात जनसुराज्य पक्षाचे संस्थापक व राजकीय रणनितीकार प्रशांत किशोर यांचा दणदणीत झालेला विजय ही शक्तिशाली भाजपाला इशारा घंटा आहे. केंद्रात व राज्यात भाजपाची सत्ता असताना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या परंपरागत मतदारसंघात भाजपाचा झालेला पराभव ही राज्य व केंद्रीय नेतृत्वावर मोठी नामुष्की आहे. दिल्लीत जंतरमंतरवर झालेले जेन झी आंदोलन, अयोध्येतील राम मंदिरात दानपेटीवर पडलेला दरोडा, देशभर वाढलेली प्रचंड बेरोजगारी व जनतेत खदखदत असलेला असंतोष याचे प्रतिबिंब बिहारमधील बांकीपुरा विधानसभा मतदारसंघातील पोट निवडणुकीत पडले. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनसुराज्य पक्षाने लढविलेल्या सर्व २३६ जागांवर दारूण पराभव झाल्यानंतर प्रशांत किशोर खचले नाहीत, त्यांनी पक्षाचे काम, संघटन बांधणी व जनसंपर्क थांबवला नाही, बकवास आश्वासने दिली नाहीत, जनतेला स्वप्नरंजनात गुंतवले नाही. बांकीपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाने सर्व ताकद पणाला लावली असतानाही किशोर यांचा १९ हजारपेक्षा जास्त मतांनी विजय झाला व तीस दशकानंतर भाजपाला आपला भक्कम गड गमवावा लागला.

गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात भाजपा- जनता यु आघाडीचे सरकार स्थापन झाले. जनता दल यु चे सर्वोच्च नेते नितिश कुमार यांचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा पुढे करून भाजपाने विधानसभा निवडणूक लढवली. निवडणुकीनंतर नितिश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथही घेतली पण काही महिन्यांतच त्यांची केंद्रात गरज असल्याचे भाजपाने त्यांना पटवून दिले व सम्राट चौधरी यांनी भाजपाचे पहिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. बिहारसारख्या मोठ्या राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री झाला म्हणून पक्षाचे नेतृत्व खूश झाले. तसेच चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आलेल्या नितिन



नवीन यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. केवळ बिहारपुरते मर्यादीत असलेल्या नेत्याला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नेमल्याचे अनेकांना आश्चर्यही वाटले. नितीन नवीन केंद्रात येणार म्हणून त्यांची राज्यसभेवर खासदार म्हणून निवडही झाली. संसदेत खासदार म्हणून गेल्याने नितिन नवीन यांनी आमदारकीचा राजीनामा दिला व त्यांच्या बांकीपूर मतदारसंघात भाजपाने पोटनिवडणूक ओढवून घेतली. निवडणुकीत जय- पराजय होत असतात, पण ज्यांची पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली, त्यांच्या राज्यातील विधानसभा मतदारसंघात पक्षाला पराभव पत्करावा लागतो हे लाजिरवाणे ठरले. नितिन नवीन यांना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष करेपर्यंत त्यांचे नाव देशात कुणाला ठाऊक असण्याचे कारण नव्हते. आमदार असताना ते प्रादेशिक नेते एवढीच त्यांची प्रतिमा होती. पश्चिम बंगालमधे झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने ममता ब'नर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला सत्तेवरून हटवले व कोलकतामधे भाजपाचे सरकार स्थापन झाले. बिहार पाठोपाठ पश्चिम बंगालमधे भाजपाचा प्रथमच मुख्यमंत्री झाला याचे श्रेय मोदी- शहांबरोबरच राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नवीन यांना दिले गेले. मग बांकीपूर मतदारसंघातील पराभवाचे खापर कुणावर फोडले जाणार ? प्रशांत किशोर यांची ख्याती निवडणूक प्रचाराचे आराखडा तज्ञ अशी आहे. त्यांनी विविध राज्यात राजकीय पक्षांना निवडणूक व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले आहे. अनेक राज्यात त्यांच्या रणनितीमुळे राजकीय पक्षाला सत्ता मिळाली व त्यांच्या बुध्दीमत्तेचा लाभ घेऊन अनेक जण मुख्यमंत्रीही झाले. गेल्या वर्षी जनसुराज्य पक्षाला विधानसभा निवडणुकीत शंभर टक्के अपयश पदरी पडल्यावर किशोर यांची सर्वत्र टिंगल टवाळी झाली. तेव्हा स्वत: किशोर उमेदवार म्हणून मैदानात नव्हते. मात्र बांकीपूरच्या पोट निवडणुकीत ते स्वत: उमेदवार म्हणून लढले व भाजपाचा पराभव करून विजयी झाले. बांकीपूर विधानसभा पोटनिवडणकीसाठी भाजपाने अगोदर अभिषेक कुमार सिन्हा यांना उमेदवारी जाहीर केली होती. गेल्या वर्षी ९ जुलै रोजी त्यांनी भाजपाचे उमेदवार म्हणून अर्जही दाखल केला होता. दोनच दिवसात चक्रे फिरली. स्वत: अभिषेक यांनी आपण निवडणूक लढवणार नाही असे जाहीर केले. भाजपाने अभिषेक यांच्या ऐवजी नीरज कुमार सिन्हा यांचे नाव उमेदवार म्हणून जाहीर केले. पक्षाने उमेदवार बदलला म्हणून कार्यकर्ते व मतदारही संभ्रमात पडले. बांकीपुर मतदारसंघातून प्रशांत किशोर यांच्या विरोधात भाजपाने एक सर्वसामान्य कार्यकर्ता उभा केला. तेव्हाच भाजपाच्या विजयाबद्दल धाकधूक वाटू लागली होती. प्रशांत किशोर भाजपाच्या उमेदवाराला भारी पडू शकतात, अशी चर्चा सुरू झाली. त्यातच दिल्लीत जेन झी आंदोलनाला धार चढली, देशभर जेन झी हजारोंच्या संख्येने रस्त्यावर उतरले. बिहारमधेही जेन झी मोर्चावर पाण्याचे फवारे मारून त्यांना रोखण्याचा प्रयत्न झाला. जेन झी आंदोलनातून भाजपाविरोधात रोष प्रकट होत राहीला. पण आपल्याला कोणी पराभूत करू शकत नाही, अशा अहंकारात भाजपाचा प्रचार चालू राहिला. किशोर यांना ६४ हजार १५१ मते मिळाली, भाजपाचे नीरज कुमार यांना ४४ हजार ८२७ तर राजदच्या रेखा कुमारी यांना १४ हजार २७३ मते मिळाली. निकालानंतर किशोर म्हणाले- बांकीपूरची निवडणूक ही केवळ आमदार निवडण्यासाठी नव्हती. निकालाने भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला स्पष्ट संदेश दिला आहे,. बिहारच्या मुख्यमंत्रीपदावर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली व्यक्ती असू नये , ही जनतेची इच्छा आहे. राज्याल शिक्षण, रोजगार, आणि विकासाला प्राधान्य देणारा मुख्यमंत्री हवा आहे. निवडणुक काळात प्रशांत किशोर यांच्या विरोधात भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन हे आठ दिवस मतदारसंघात तळ ठोकून होते. मुख्यमंत्री सम्राट चौधरी, राज्याचे मंत्री, पक्षाचे १८ खासदार , २७ आमदार, भोजपुरी चित्रपटातील कलाकार अहोरात्र मतदारांना आकर्षित करीत होते. सत्ताधारी पक्षाचाचा बोलबाला व्हावा यासाठी साथीला गोदी मिडिया होताच. तरीही किशोर यांनी १९ हजारांचे मताधिक्य घेऊन भाजपावर मात केली. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षदाच्या पदग्रहण सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नितिन नवीन यांचे अभिनंदन करताना मेरे बॉस हैं, नितीन जी.. असे उदगार काढले होते. मोदींच्या बॉसच्या मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला अशी चर्चा सुरू झाली आहे. प्रशांत किशोर यांच्या विजयाने भाजपा स्तब्ध झाला आहेआणि राजदला भविष्याची चिंता भेडसावू लागली आहे. बांकीपूरवर गेली तीस वर्षे फडकत असलेल्या भगवा मतदारांनी खाली खेचला आहे व तिथे जनसुराज्य पक्षाचा पिवळा झेंडा फडकू लागला आहे. प्रशांत किशोर यांच्या विजयामुळे मुख्यमंत्री सम्राट चौधरी व राजदचे प्रमुख तेजस्वी यादव यांच्यापुढे नवे आव्हान उभे राहिले आहे. बिहारच्या विधानसभेत किशोर हे पक्षाचे एकमेव आमदार असतील पण भाजपा सरकारला हैराण करतील. भाजपाने बांकीपूरच्या पोटनिवडणुकीत सारी शक्ति व कल्पकता पणाला लावली होती. प्रचारात बजरंग बली हनुमानाच्या वेषात एका कलाकाराला नाचवत ठेवले. पण हनुमान भाजपावर प्रसन्न झाला नाही. बांकीपूर से कुत्ता - बिल्ली भी लढा देंगे तो भी बीजेपी जीत जायेगी, अशा भाषेत भाजपाचे बिहारचे नेते व माजी केंद्रीयमंत्री रविशंकर प्रसाद यांनी मुक्ताफळे उधळली होती. मतदारांना गृहित धरून चालणार नाही, हाच संदेश बांकीपूरने देशाला दिला आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# मूर्ती बुद्धाची की देवाची? प्रश्न केवळ मूर्तीचा नाही, तर सत्याच्या शोधाचा आहे!

**इतिहासाच्या** पानांवर काही प्रश्न असे असतात, ज्यांची उत्तरे शोधताना वर्तमानाची राजकीय, धार्मिक आणि सामाजिक समीकरणेही हादरतात. तामिळनाडूतील सेलम जिल्ह्यातील पेरीयरी गावातील 'थलावेट्टी मुनियप्पन' मंदिरातील मूर्तीबाबत मद्रास उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय असाच एका मोठ्या प्रश्नाला स्पर्श करून जातो. ही मूर्ती हिंदू देवतेची नसून भगवान बुद्धांची असल्याचे पुरातत्त्वीय तपासणीत निष्पन्न झाले आणि न्यायालयाने त्या निष्कर्षाला गांभीर्याने घेतले. मात्र या प्रकरणाचा अर्थ केवळ 'एक मंदिर बुद्धविहार ठरले' एवढाच काढणे धोकादायक ठरेल. याचा खरा अर्थ आहे, सत्य कोणत्याही श्रद्धेपेक्षा मोठे असते आणि पुरावा कोणत्याही पूर्वग्रहापेक्षा श्रेष्ठ असतो. मद्रास उच्च न्यायालयासमोर प्रश्न आला तो एका मूर्तीच्या ओळखीचा. बुद्ध ट्रस्टने दावा केला की पेरीयरी येथील मूर्ती मूळतः बुद्धांची आहे; कालांतराने तिची ओळख बदलली गेली आणि तिची पूजा 'थलावेट्टी मुनियप्पन' म्हणून सुरू झाली. राज्य सरकारकडून मात्र या ठिकाणी दीर्घकाळापासून स्थानिक लोक पूजा करीत असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. म्हणजेच एका बाजूला परंपरा आणि दुसऱ्या बाजूला इतिहास व पुरातत्त्वीय पुरावे उभे होते.

न्यायालयाने भावनेच्या आधारावर निर्णय दिला नाही. उलट पुरातत्त्व विभागाला मूर्तीची तपासणी करण्याचे निर्देश दिले. तज्ज्ञ समितीने मूर्तीची तपासणी करून तिच्या शिल्पवैशिष्ट्यांचा अभ्यास केला. मूर्ती अर्धपद्मासनात बसलेली असून हात ध्यानमुद्रेत आहेत. कुरळे केस, उष्णीष आणि लांब कानपाळी यांसारखी बुद्धमूर्तीची वैशिष्ट्ये त्यात आढळली. उपलब्ध पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक पुराव्यांचा अभ्यास करून समितीने या मूर्तीमध्ये बुद्धांच्या अनेक 'महापुरुष लक्षणांचा' समावेश असल्याचे मत नोंदवले. इथेच न्यायपालिकेची खरी भूमिका अधोरेखित होते. न्यायालयाने कोणाची श्रद्धा जिंकली किंवा हरवली नाही, न्यायालयाने पुराव्याला बोलू दिले. ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही म्हणजे केवळ बहुमताने निर्णय घेणे नव्हे. लोकशाही म्हणजे अल्पसंख्याकांच्या अधिकारांचे संरक्षण, ऐतिहासिक सत्याचा आदर, संस्थात्मक स्वायत्तता आणि संविधानाच्या चौकटीत न्याय देणे. एखाद्या ठिकाणी शंभर वर्षे एखाद्या नावाने पूजा झाली म्हणून त्या मूर्तीची मूळ ओळखही तीच असली पाहिजे, असे विज्ञान सांगत नाही. परंपरा महत्त्वाची आहे; पण परंपरेला सत्याचा पर्याय बनविता येत नाही.

न्यायमूर्ती एन. आनंद वेंकटेश यांनी पुरातत्त्व विभागाच्या अहवालानंतर मूर्तीला 'थलावेट्टी मुनियप्पन' म्हणूनच पाहणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका घेतली. 'चुकीची ओळख' कायम ठेवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मूर्तीचे मूळ स्वरूप पुनर्स्थापित करण्याचे निर्देश देतानाच तिचा ताबा हिंदू धार्मिक आणि धर्मादाय निधी विभागाऐवजी पुरातत्त्व विभागाकडे देण्याचे निर्देश देण्यात आले. बुद्ध म्हणून मूर्तीची ओळख दर्शविणारा फलक लावण्याचे आणि मूर्तीवर पूजा किंवा इतर धार्मिक विधी न करण्याचे निर्देशही देण्यात आले. या निर्णयावर मतभेद असू शकतात आणि असायलाही हवेत. कारण लोकशाहीत न्यायालयाच्या निर्णयावर चिकित्सक चर्चा करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. मात्र पुराव्याच्या आधारे घेतलेल्या न्यायालयीन निर्णयाला केवळ धार्मिक चष्म्यातून पाहून न्यायपालिकेवरच संशय घेणे ही लोकशाहीसाठी धोकादायक वाटचाल ठरू शकते. आज प्रश्न बुद्धाचा नाही, हिंदूंचाही नाही तर प्रश्न आहे, सत्याचा मालक कोण? सत्याचा मालक ना बहुसंख्य समाज असतो, ना अल्पसंख्याक. सत्याला ना जात असते, ना धर्म. पुरातत्त्वीय पुरावा काही वेगळे सांगत असेल तर त्याची तपासणी करणे, त्यावर प्रश्न उपस्थित करणे आणि त्याचे शास्त्रीय खंडन करणे, हे सर्व लोकशाहीत मान्य आहे. पण पुरावा नाकारून केवळ श्रद्धेच्या नावावर इतिहास ठरविणे ही वैज्ञानिक आणि लोकशाही वृत्ती ठरू शकत नाही.

भारतीय समाजाचा इतिहास अनेक प्रवाहांच्या संगमातून तयार झाला आहे. बौद्ध, जैन, हिंदू आणि विविध लोकपरंपरांनी या भूमीला समृद्ध केले आहे. अनेक प्राचीन स्थळांची ओळख काळानुसार बदलली. काही परंपरा एकमेकांत मिसळल्या. काही प्रतिमा नव्या धार्मिक संदर्भात स्वीकारल्या गेल्या. त्यामुळे इतिहासाचा शोध घेताना भावनिक घोषणा नव्हे, तर शास्त्रीय संशोधन आणि पुराव्यांची कसोटी आवश्यक आहे आणि म्हणूनच या प्रकरणात न्यायपालिकेची भूमिका महत्त्वाची ठरते. न्यायालय हे बहुमताच्या भावनेचे व्यासपीठ नाही तर ते संविधानाचे संरक्षक व्यासपीठ आहे. जर एखाद्या नागरिकाला किंवा संस्थेला वाटत असेल की एखाद्या ऐतिहासिक वस्तूची, स्थळाची किंवा प्रतिमेची ओळख चुकीची आहे, तर त्याला न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचा अधिकार आहे. त्या दाव्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. पुरातत्त्वीय तज्ज्ञांचे मत घेतले पाहिजे. पुरावे तपासले पाहिजेत. दोन्ही बाजू ऐकल्या पाहिजेत आणि त्यानंतर न्यायालयाने निर्णय दिला पाहिजे. हीच संविधानिक लोकशाहीची खरी ताकद आहे. या निर्णयाकडे 'एका धर्माचा विजय आणि दुसऱ्या धर्माचा पराभव' म्हणून पाहणे म्हणजे त्याच्या व्यापक संदेशाचे नुकसान करणे होय. बुद्धांनी सांगितलेला मार्ग प्रज्ञेचा, करुणेचा आणि सत्यशोधाचा होता. त्यामुळे बुद्धमूर्तीची ओळख पटविताना न्यायालयाने पुराव्याला दिलेले महत्त्व हे बुद्धांच्या विचारांशीही सुसंगत वाटते. मात्र या निर्णयातून आणखी एक मोठा प्रश्न उभा राहतो. देशातील अशा किती प्राचीन मूर्ती, लेणी, स्थळे आणि शिल्पांची ओळख आजही अज्ञानाच्या धुक्यात आहे? त्यासाठी प्रत्येक धार्मिक स्थळावर न्यायालयीन वाद निर्माण करण्याची गरज नाही. केंद्र आणि राज्य सरकारांनी पुरातत्त्व तज्ज्ञ, इतिहासकार, शिल्पकला अभ्यासक आणि संबंधित समुदायांच्या प्रतिनिधींच्या सहभागातून वैज्ञानिक दस्तऐवजीकरण करायला हवे. इतिहास हा राजकीय घोषणांचा विषय न बनता संशोधनाचा विषय राहिला पाहिजे. कारण इतिहासाला हात लावला की वर्तमान पेटते पण इतिहास समजून घेतला तर भविष्य उजळते. आज सोशल मीडियाच्या काळात न्यायालयीन निर्णयांचे अर्धवट अर्थ काढून धार्मिक संघर्ष निर्माण करणे सोपे झाले आहे. 'हिंदू मंदिर बौद्ध मंदिर झाले', 'हिंदू धर्मावर आघात झाला', 'बुद्धांची स्थळे हिसकावली' अशा टोकाच्या भूमिका समाजात फूट पाडू शकतात. प्रत्यक्षात या प्रकरणातील न्यायालयीन आदेशाचा केंद्रबिंदू होता, पुरातत्त्वीय निष्कर्ष आणि त्या निष्कर्षानुसार मूर्तीची योग्य ओळख. म्हणून या प्रकरणातून भारतीय समाजाने एक धडा घ्यायला हवा. श्रद्धा जपा, पण सत्याला घाबरू नका. परंपरेचा सन्मान करा, पण पुराव्याला दाबू नका. धर्मावर प्रेम करा, पण न्यायालयाचा अवमान करू नका. इतिहासाचा अभिमान बाळगा, पण इतिहासाची मोडतोड करू नका. न्यायपालिकेने दिलेला प्रत्येक निर्णय अंतिम सत्य असेलच असे नाही. त्यावर अपील करता येते, पुनर्विचार मागता येतो आणि कायदेशीर मार्ग उपलब्ध असतात. पण निर्णय संविधानिक प्रक्रियेतून आला असेल, तर त्याचा आदर करणे ही लोकशाहीची किमान शिस्त आहे. कारण न्यायालये चुकू शकतात, सरकारे चुकू शकतात, समाजही चुकू शकतो. पण चूक दुरुस्त करण्यासाठी स्वतंत्र न्यायपालिका, मुक्त चर्चा आणि संविधानिक व्यवस्था जिवंत ठेवणे, हीच लोकशाहीची खरी सुरक्षा आहे. सेलमच्या त्या मूर्तीसमोर आज एक प्रश्न उभा आहे, ती बुद्धाची आहे की मुनियप्पनची? पुरातत्त्वीय पुराव्यांनी न्यायालयाला एक उत्तर दिले आहे. पण भारतीय लोकशाहीसमोर त्याहून मोठा प्रश्न उभा राहतो. आपण सत्य समोर आले तर ते स्वीकारण्याइतके प्रगल्भ आहोत का? या प्रश्नाचे उत्तरच आपल्या लोकशाहीच्या परिपक्वतेचे खरे मोजमाप ठरेल. म्हणून हा निर्णय केवळ एका मूर्तीच्या ओळखीचा निर्णय नाही. तर हा निर्णय आहे, पुराव्याचा विजय की पूर्वग्रहाचा? संविधानाचा आवाज की जमावाच्या भावनेचा? न्यायाचा मार्ग की धार्मिक राजकारणाचा?उत्तर आपणच ठरवायचे आहे. कारण बुद्ध असोत, मुनियप्पन असोत किंवा कोणत्याही श्रद्धेचे प्रतीक असो. सत्याला धर्म नसतो,न्यायाला जात नसते आणि संविधानाला बहुसंख्य-अल्पसंख्य असा भेद नसतो. याच मूल्यांवर लोकशाही उभी आहे. म्हणूनच न्यायपालिकेचे स्वातंत्र्य जपणे, न्यायालयीन प्रक्रियेवर विश्वास ठेवणे आणि पुराव्यावर आधारित निर्णयांचा सन्मान करणे ही कोणत्याही एका धर्माची बाजू नसून. ही भारतीय संविधानाची, भारतीय लोकशाहीची आणि सत्याच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका आहे.

# देशातील चार हजार पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदार गुन्हेगारीच्या खटल्यांच्या रांगेत असेल तर;देशाच्या जनतेने काय करावे?

देशातील आमदार-खासदार जर गुन्हेगारीतुन संविधानिक पदावर बसत असेल तर देशाचे पुढील भवितव्य किंवा भविष्य जेन-झीसाठी किंवा जेन-अल्फासाठी धोका निर्माण करू शकते.कारण देशातील ४००० पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदारांविरूध्द एकूण ४१९२ गुन्हेगारी प्रकरणातील खटले आजही प्रलंबित आहेत. तरीही लोकप्रतिनिधींचा बहुमान;हा तर लोकशाहीचा घोर अपमान व जेन-झीवर आणि जेन-अल्फावर घणाघाती प्रहारच म्हणावा लागेल.राजकीय पुढाऱ्यांच्या या चुकीच्या मार्गामुळे देशात कोणत्या प्रकारची लोकशाही आहे हे कळायला मार्ग नाही.

देशात एकीकडे भ्रष्टाचाराचा महापूर दिसून येतो तर दुसरीकडे गुन्हेगारीचे प्रलंबित खटले यामुळे देशातील मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झाल्याचे दिसून येते;तर दुसरीकडे बेरोजगारी,महागाई,शिक्षण इत्यादी अनेक समस्यांचा मोठा डोंगर उभा आहे व त्यात भर टाकत आहे गुन्हेगारीचे खटले असणारे आमदार-खासदार हे तर लोकशाहीला काळीमा फासणारी घटना म्हणावी लागेल.कारण ज्यांना आपण लोकप्रतिनिधी समजतो आणि देशासह राज्यांचा कारभार पहातात अशा आमदार-खासदारांवर गुन्हे असतांना सरकारच्या सुरक्षेयंत्रणेखाली वावरतात व देशाच्या १४५ कोटी जनतेला ग्यान पाजतात हे कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत हे तर देशाचे मुख्य कसाईच म्हणावे लागेल. कारण देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक,गंभीर व देशाला धक्का देणारी माहिती समोर आली आहे.लोकसभेतील ५४३ खासदारांपैकी २५१,तर राज्यसभेतील २३३ खासदारांपैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी प्रकरणातील खटले प्रलंबित आहेत.म्हणजे देशातील अर्धे खासदार गुन्हेगारी क्षेत्रातुन येवून दिल्लीत लोकसभेत व राज्यसभेत बसले आहेत ही कीती शर्मेची बाब म्हणावी! यावरून स्पष्ट होते की, देशात किंवा राज्यात जे काही गुन्हेगारी प्रवृत्ती दिसून येते त्याला कारणीभूत देशातील गुन्हेगार लोकप्रतिनिधीच(गुन्हेगार आमदार-खासदार) म्हणावे लागेल.त्याचप्रमाणे देशातील २८ राज्यांपैकी १४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःविरूद्ध गुन्हेगारी प्रकरणे असल्याचे जाहीर केले.तरीही ते आजही मुख्यमंत्री पदावर विराजमान आहेत ही किती लाजीरवाणी व शर्मेची गोष्ट म्हणावी.म्हणजे आपण गुन्हेगार आहोत आणि महत्वपूर्ण पदावर बसण्यालायक नाही हे माहीत असूनही महत्वाच्या पदांवर कार्यरत आहेत यावरून स्पष्ट होते की, देशातील आजी-माजी आमदार-खासदार कायदा,स्वाभिमान,संविधान,लोकशाही, लोकांच्या वेदना व देशाचे हित बाजूला सारून महत्त्वाच्या पदांवर विराजमान आहेत ही अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर बाब म्हणावी लागेल. भारतात लोकशाही आहे आणि लोकशाही प्रमाणे देश चालतो असे म्हटले जाते.परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे, देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक व गंभीर माहिती समोर आल्याने देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा दुखावल्या आहेत.ऑगस्ट २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अधिकृत अहवालानुसार, देशातील ३२६ खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यामध्ये लोकसभेतील ५४३ पैकी २५१ खासदार आणि राज्यसभेतील २३३ पैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी खटले आहेत. म्हणजे लोकसभेच्या ४६ टक्के खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे खटले आहेत तर ३३ टक्के गुन्हेगारी खटले राज्यसभेच्या खासदारांवर आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लोकसभेच्या २५१ पैकी १७० खासदारांवर अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे (उदा. खून, खुनाचा प्रयत्न,अपहरण आणि महिलांविरोधातील गुन्हे) दाखल आहेत तरी ते लोकप्रतिनिधी आहेत.राज्यसभेच्या बाबतीत विचार केला तर गंभीर गुन्हे असलेल्या ७५ खासदारापैकी ४० खासदारांवर ५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळाच्या शिक्षेची तरतूद असलेले गंभीर गुन्हे दाखल आहेत.म्हणजे अर्धा देश गुन्हेगार आमदार-खासदांच्या मार्गदर्शनाखाली चालतो की काय असे चित्र दिसत आहे.महत्वाचे म्हणजे एकूण प्रलंबित खटल्यामध्ये देशातील ४००० पेक्षा अधिक आजी-माजी आमदार-खासदारांवर ४,१९२ हून अधिक फौजदारी खटले सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत. अहवालानुसार राज्यनिहाय आकडेवारीचा विचार केला तर केरळ राज्यातील सर्वाधिक म्हणजेच ९५% (२० पैकी १९) खासदारांवर गुन्हे दाखल आहेत. त्यापाठोपाठ तेलंगणामध्ये ८२% आणि ओडिशामध्ये ७६% खासदारांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे. महाराष्ट्र,उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालमधील सुमारे ५०% खासदारांवर गुन्हेगारी खटले सुरू आहेत. म्हणजे देश कुठे जात आहे याचा विचार राजकीय पुढाऱ्यांनी करने गरजेचे आहे.अहवालानुसार २८ राज्यांपैकी १४ राज्यातील मुख्यमंत्र्यांवर फौजदारी खटले आहेत यात प्रामुख्याने तेलंगणाचे मुख्यमंत्री अनुमुला रेवंत रेड्डी यांच्या विरुद्ध सर्वाधिक ८९ प्रकरणे आहेत, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुबेंदू अधिकारी यांच्या विरुद्ध २९ प्रकरणे आहेत.

कर्नाटकचे मुख्यमंत्री बी.के.शिवकुमार यांच्या विरुद्ध १९ प्रकरणांची नोंद असल्याचे सांगितले जाते. अशाप्रकारे १४ राज्यांच्या वेगवेगळ्या मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत सर्वप्रथम गुन्हेगारी प्रकरणातील खटल्याचा निकाल जलदगतीने लावून या आमदार-खासदारांची विल्हेवाट लावून यांना ताबडतोब बर्खास्त करून यांचे पगार,पेन्शन,भत्ते रद्द केले पाहिजे व त्यांनी केलेल्या गुन्ह्याची शिक्षा त्यांना मिळायला पाहिजे.कारण कोणताही लोकप्रतिनिधी असो त्यांच्यावर असलेले गंभीर गुन्हे देशाला व देशहिताला घातक ठरू शकते. त्यामुळे देशातील संपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आमदार-खासदारांच्या मुसक्या महामहीम राष्ट्रपती,सुप्रीम कोर्ट व सरकारनी कायद्याच्या मार्फत आवळल्या पाहिजे अशी या लेखाद्वारे विनंती करतो.जय हिंद.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )

# एमपीएससी निकालात 'महाज्योती'ची सुवर्णभरारी १२३ बहुजन विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

## राज्य कर निरीक्षक पदाच्या ३५ टक्के जागांवर 'महाज्योती'ची मोहोर


छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) – बहुजन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूरच्या प्रयत्नांना पुन्हा एकदा मोठे यश मिळाले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अराजपत्रित गट–ब दुय्यम सेवा २०२५ अंतर्गत घेण्यात आलेल्या राज्य कर निरीक्षक (स्टेट टॅक्स इन्सपेक्टर) आणि दुय्यम निबंधक (सब रजिस्ट्रार) मुख्य परीक्षेच्या निकालात 'महाज्योती'च्या तब्बल १२३ बहुजन विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. राज्य कर निरीक्षक पदाच्या एकूण २८० जागांपैकी १०१ विद्यार्थी 'महाज्योती'चे असून, एकूण यशस्वी उमेदवारांमध्ये त्यांचा वाटा तब्बल ३५ टक्के आहे. तर दुय्यम निबंधक पदाच्या ८४ जागांपैकी २२ विद्यार्थी 'महाज्योती'चे असून, या पदातील त्यांचा वाटा २५ टक्के आहे. दोन्ही पदांमध्ये मिळून १२३ विद्यार्थ्यांनी मिळिवलेले यश संस्थेच्या प्रशिक्षणाची आणि मार्गदर्शनाची प्रभावीता अधोरेखित करणारे ठरत असल्याचे मत 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी व्यक्त केले.

पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्यातही 'महाज्योती'चे विद्यार्थी मोठ्या संख्येने यशस्वी होतील, असा विश्वास 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांनी व्यक्त केला. राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेली 'महाज्योती' ही स्वायत्त संस्था गेल्या सात वर्षांपासून बहुजन विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण, सक्षम मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत आहे. या प्रयत्नांमुळे स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या यशाची व्याप्ती वाढत असून, प्रशासनातील विविध सेवांमध्ये त्यांचा सहभागही वाढत आहे. याशिवाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२४ मधील अराजपत्रित परीक्षेच्या जानेवारीत महिन्यात जाहीर झालेल्या अंतिम निकालातही 'महाज्योती'च्या १५० विद्यार्थ्यांनी यश मिळिवले आहे. संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून मिळणारे हे यश उद्दिष्टपूर्तीची दिशा स्पष्ट करणारे असल्याचेही मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले.

**प्रशासनात बहुजन तरुणांचा वाढता सहभाग अभिमानास्पद : अतुल सावे**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट–ब परीक्षेत 'महाज्योती'च्या १२३ विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या दैदिप्यमान यशाबद्दल राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा 'महाज्योती'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी आनंद आणि समाधान व्यक्त केले आहे. बहुजन समाजातील गुणवंत तरुणांना स्पर्धा परीक्षांमध्ये मार्गदर्शनाची योग्य दारे उघडी करून देणे हेच 'महाज्योती'चे मूळ उद्दिष्ट आहे. राज्य कर निरीक्षक पदाच्या ३५ टक्के जागांवर 'महाज्योती'च्या विद्यार्थ्यांनी मारलेली धडक ही राज्य शासनाच्या कल्याणकारी धोरणांची आणि संस्थेच्या प्रभावी मार्गदर्शनाची पावती आहे. ग्रामीण व सर्वसामान्य पार्श्वभूमीतून आलेल्या या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश संपूर्ण महाराष्ट्रासाठी भूषणावह आहे. भविष्यातही राज्यातील एकाही बहुजन विद्यार्थ्याचे स्वप्न आर्थिक किंवा इतर अडचणींमुळे अपूर्ण राहणार नाही, यासाठी शासन आणि महाज्योती संस्था पूर्ण ताकदीने विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभी राहील. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील प्रशासकीय प्रवासासाठी उदंड शुभेच्छा, असे मंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले.

# नानीच्या करिअरमधील सर्वात बेधडक भूमिका! 'द पॅराडाईज'मध्ये सेक्स वर्करच्या मुलाची व्यक्तिरेखा



'द पॅराडाईज'मध्ये नॅचरल स्टार नानी मुख्य भूमिकेत दिसणार असून, 'जर्सी' आणि 'हाय नन्ना' यांसारख्या चित्रपटांमधील दमदार आणि भावनिक भूमिकांसाठी तो ओळखला जातो. या चित्रपटात नानी पहिल्यांदाच एका अगदी वेगळ्या, इंटेन्स आणि बेधडक अवतारात दिसणार आहे. रॉ ड्राम ासोबतच जबरदस्त ॲक्शनचीही झलक यात पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट २४ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

'द पॅराडाईज' हा भारतीय सिनेमातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटात नॅचरल स्टार नानी मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध फिल्ममेकर श्रीकांत ओडेला यांनी केले असून, यापूर्वी त्यांनी ब्लॉकबस्टर 'दसरा'चे दिग्दर्शन केले आहे. घोषणेनंतरपासूनच या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपटाचा दमदार टीझर, पोस्टर्स आणि गाणे इंटरनेटवर चांगलेच गाजत असून, ॲक्शन, ड्रामा आणि थ्रिलने भरलेल्या एका वेगळ्या सिनेमाची झलक प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. टीझरमध्ये नानीच्या 'जडाल' या व्यक्तिरेखेचीही दमदार झलक पाहायला मिळाली आहे. त्याचा लूक आणि अंदाज अतिशय धोकादायक, रॉ आणि देशी स्वरूपाचा दिसत आहे. चित्रपटाची कथा झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे.

टीझरमध्ये नानीची व्यक्तिरेखा अशा एका व्यक्तीच्या रूपात समोर येते, जो प्रतिकूल परिस्थितीतून एक अनपेक्षित नेता म्हणून पुढे येतो. टीझरमध्ये त्याच्या हिंसक आणि कोणा समोरही न झुकणाऱ्या वृत्तीची झलकही पाहायला मिळाली आहे. मात्र, चित्रपटाशी संबंधित एका सूत्राच्या माहितीनुसार, नानी सेक्स वर्करच्या मुलाची भूमिका साकारणार असून, त्याची दमदार बॅकस्टोरी त्याच्या व्यक्तिरेखेतील बदलामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

सूत्राने सांगितले, नानी चित्रपटात आतापर्यंतच्या सर्वात बेधडक आणि धोकादायक अवतारात दिसणार आहे. टीझरम ध्ये आपण जे पाहिले आहे, ती फक्त सुरुवात आहे. नानी एका पूर्णपणे ॲक्शनने भरलेल्या अवतारात दिसणार असून, या भूमिकेत तो कोणावरही दया करताना दिसणार नाही. ही व्यक्तिरेखाच त्याच पद्धतीने डिझाइन करण्यात आली आहे.

सूत्राने पुढे सांगितले, त्याच्या व्यक्तिरेखेला एक मजबूत बॅकस्टोरीदेखील आहे. समाजात त्याचा जन्म सोनाली कुलकर्णी यांनी साकारलेल्या सेक्स वर्करच्या पोटी होतो. तो सर्वात वाईट परिस्थिती असलेल्या झोपडपट्ट्यांपैकी एका ठिकाणी राहतो आणि मोहन बाबू तसेच त्यांचा मुलगा असलेल्या राघव जुयालच्या व्यक्तिरेखांकडून होणाऱ्या मोठ्या माफिया जमीनदारांच्या अत्याचाराचा सामना करतो. त्याला एका छोट्याशा जागेत अक्षरशः दाबून ठेवले जाते आणि याच वातावरणातून नानीची व्यक्तिरेखा लोकांचा रक्षक म्हणून समोर येते. चित्रपटाचे विश्व भव्य स्तरावर दाखवण्यासाठी निर्मात्यांनी मोठी मेहनत घेतली आहे. कथेला साजेसे वातावरण निर्माण करण्यासाठी खास एका मोठ्या झोपडपट्टीचा सेट उभारण्यात आला आहे. सुमारे २.५ एकरांवर पसरलेल्या या सेटची निर्मिती करण्यापूर्वी भारतातील विविध झोपडपट्ट्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला, जेणेकरून चित्रपटातील लोकेशनमध्ये वास्तवतेसोबतच भव्यतेचीही अनुभूती मिळेल.

दरम्यान, 'द पॅराडाईज'चा टीझर आणि त्याच्याशी संबंधित प्रमोशनल कंटेंट सातत्याने नवे रेकॉर्ड करत आहेत. चित्रपटातील 'आया शेर' या गाण्याने यूट्यूबवर २०० मिलियनहून अधिक व्ह्यूजचा टप्पा पार केला असून, त्याला १.८ मिलियनहून अधिक लाइक्स मिळाले आहेत. हे गाणे सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. इन्स्टाग्रामवर हजारो रील्स तयार करण्यात आल्या असून, चाहते नानीचा लूक आणि त्याचा सिग्नेचर हुकस्टेप रिक्रिएट करत आहेत. या सर्व गोष्टींमुळे चित्रपटाबद्दलची प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे.

एसएलव्ही सिनेमाजच्या बॅनरखाली तयार झालेला 'द पॅराडाईज' २४ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या स्तरावर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट हिंदी, तेलुगू, तमिळ, इंग्रजी, स्पॅनिश, बंगाली, कन्नड आणि मल्याळम अशा आठ भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. चित्रपटाची ग्लोबल पोहोच लक्षात घेता, निर्मात्यांनी हॉलिवूड स्टार रायन रेनॉल्ड्स यांच्याशीही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत 'द पॅराडाईज' सादर करण्यासाठी संपर्क साधला आहे. दमदार दिग्दर्शक, शानदार स्टारकास्ट आणि भव्य स्तरावरील कथानकामुळे 'द पॅराडाईज'बद्दल चाहत्यांची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे.

# राज्यातील हवामानात प्रचंड उलटफेर!

मुंबई, दि. २२(प्रतिनिधी) – महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून मान्सूनचा जोर कमी झाला असून राज्यातील बहुतांश भागात पावसाने उघडीप घेतली आहे. काही ठिकाणी ढगाळ वातावरणासह हलक्या सरी पडत आहेत, तर अनेक भागांत दमट आणि उष्ण हवामान जाणवत आहे. २३ ऑगस्ट रोजी राज्यातील कोणत्याही जिल्ह्याला जोरदार पावसाचा अलर्ट देण्यात आलेला नाही.

कोकण विभागातही पावसाचा जोर कमी राहण्याचा अंदाज आहे. २३ ऑगस्ट रोजी कोणताही पावसाचा अलर्ट नसून काही भागांत हलक्या ते मध्यम सरी पडण्याची शक्यता आहे. पुढील चार ते पाच दिवस कोकणात पावसाचा जोर कमी राहण्याचा अंदाज आहे. दमट हवामानासोबत काही काळ सूर्यदर्शन होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातही पावसाने काहीशी विश्रांती घेतली आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत काही ठिकाणी हलक्या सरी पडू शकतात. मात्र, जोरदार पावसाचा कोणताही इशारा देण्यात आलेला नाही. घाटमाथ्यावरील भागातही पावसाचा जोर कमी राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात गुरुवारी काही जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला होता. मात्र, २३ ऑगस्ट रोजी कोणत्याही जिल्ह्याला पावसाचा अलर्ट नाही. छत्रपती संभाजीनगर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड आणि लातूर परिसरात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. जोरदार पाऊस नसल्याने या भागातील पावसाची तूट कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुबार पेरणी आणि उभ्या पिकांच्या नुकसानीची चिंता शेतकऱ्यांना आहे. विदर्भातही गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला आहे. पुढील काही दिवस बहुतांश भागात कोरडे, दमट आणि उष्ण हवामान राहण्याची शक्यता आहे.

# विज्ञानवाद, मानवतावाद सर्व घटकांमध्ये पोहोचला पाहिजे : डॉ. पी. एस. चंगोले

## गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार





छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला मोक्याच्या जागा काबीज करण्याचा विचार दिला. समाजातील दुःख दूर करण्यासाठी शासकीय निधी आणि अधिकारांचा उपयोग करणे आवश्यक असून, त्यासाठी अधिकार आपल्या हातात घेणे गरजेचे आहे. संविधानाची अंम लबजावणी करणे हे प्रत्येक नागरिक, अधिकारी आणि लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. त्यातूनच विज्ञानवाद आणि मानवतावाद समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन सत्यशोधक प्रबोधनकार ॲड. डॉ. पी. एस. चंगोले यांनी केले.

गुरू रविदास सत्यशोधक समाजाच्या वतीने आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी तसेच सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन किर्ती मंगल कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. चंगोले बोलत होते. डॉ. चंगोले पुढे म्हणाले की, विद्यार्थी हे भारताचे भविष्य आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे साहित्य आणि विचार वाचले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे जीवन मानवतावादी आणि विज्ञानवादी विचारांवर आधारित असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन




कसा निर्माण होईल, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि धाडस कसे विकसित होईल, तसेच त्यांच्यामध्ये नैतिकता आणि नीतिमत्ता कशी रुजेल, याकडे पालकांनी विशेष लक्ष दिले पाहिजे.

भारताला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात आयएएस अधिकाऱ्यांच्या काम काजाचीही समीक्षा झाली पाहिजे. किती अधिकारी आपल्या कार्यालयातील दालनांच्या बाहेर पडून सामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेतात? त्यांनी विद्यार्थ्यांच्या आणि नागरिकांच्या अडचणी कितपत समजून घेतल्या, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. कार्यक्रमाचे उद्घाटन नंदाताई सोनटक्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता अनिल निंभोरे, सामाजिक कार्यकर्त्या नंदा सोनटक्के, पार्वती चिमकर, सेवानिवृत्त नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक साहेबराव दुतोंडे, सामाजिक कार्यकर्त्या अंजनाबाई टोंपे, डॉ. प्रा. गीता बरोदे, आशा बरसावने, दुर्गा गतखने आणि चळवळीचे महासचिव ग. मा. पिंजरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास महिलांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. कार्यक्रमातील शिस्त, नियोजन आणि नेटके आयोजन उपस्थितांच्या विशेष लक्षात राहिले.


कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बी. सी. वाडेकर, अशोक वाढई, डी. वाय. ठोंबरे, भगवान बाविस्कर, ब्रिजलाल बन्सवाल, एच. वाय. गतखने, सुभाष बडोदे, चंद्रकांत कांबळे, बी. जी. तुपे, डॉ. किशोर गव्हाळे, गुलाबराव दुतोंडे, गणेश जाधव, गणेश पानझाडे, प्रविण बोर्डे आदींनी परिश्रम घेतले. तसेच एस टू डी दलाच्या सहभागामुळे कार्यक्रमात वेगळेच आकर्षण निर्माण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोषराव लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन सी. एम. रमने, जी. के. काटकर, प्रियंका पुसे आणि पूजा पुसे यांनी केले, तर रमेश डोंगरे यांनी आभार मानले.

# मनोज बाजपेयी आणि सौरभ शुक्ला स्टारर महात्मा गांधींची अनटोल्ड स्टोरी साकारण्यासाठी अनुभव सिन्हा आणि सुधीर मिश्रा एकत्र आले

**राष्ट्रीय** पुरस्कार विजेते मनोज बाजपेयी पहिल्यांदाच एका प्रभावी ड्रामामध्ये महात्मा गांधींची भूमिका साकारणार आहेत. सुधीर मिश्रा दिग्दर्शित आणि अनुभव सिन्हा यांच्या बनारस मीडिया वर्क्स बॅनरअंतर्गत निर्मित हा चित्रपट भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातील फारसा परिचित नसलेल्या २१ दिवसांच्या एका महत्त्वपूर्ण अध्यायाचा उलगडा करणार आहे.

गेल्या दशकात अनुभव सिन्हा यांनी भारतीय सिनेमातील सर्वाधिक अष्टपैलू क्रिएटिव्ह व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणून स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मुल्क, आर्टिकल १५ आणि थप्पड यांसारख्या प्रभावी आणि विचार करायला भाग पाडणाऱ्या चित्रपटांमधून त्यांनी सातत्याने मोठ्या पडद्यावर महत्त्वाचे मुद्दे म ांडले आहेत आणि कथाकथनाचे नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. दिग्दर्शनासोबतच निम ीता म्हणूनही अनुभव सिन्हा यांनी इंडस्ट्रीतील वेगवेगळ्या आवाजांना पाठिंबा दिला असून प्रामाणिकपणा आणि दमदार सिनेमॅटिक दृष्टिकोनासह अनेक खास कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवल्या आहेत.

आता त्यांचा पुढील प्रोजेक्ट एका नव्या आणि खास प्रवासाची सुरुवात करणार आहे, कारण ते दिग्गज चित्रपट निर्माते सुधीर मिश्रा यांच्या आगामी दिग्दर्शकीय चित्रपटाची निर्मिती करत आहेत. सुधीर मिश्रा हिंदी सिनेमात आपल्या ४० वर्षांच्या प्रवासाचा टप्पा गाठण्याच्या उंबरठ्यावर आहेत. हजारों ख्वाहिशें ऐसी, धारावी आणि इस रात की सुबह नहीं यांसारख्या मॉडर्न क्लासिक्सनी



सजलेल्या त्यांच्या शानदार कारकिर्दीच्या पार्श्वभूमीवर हा प्रोजेक्ट विशेष महत्त्वाचा ठरतो. इंडस्ट्रीतील सर्वोत्तम आणि सर्वाधिक सन्मानित दिग्दर्शकांपैकी एक असलेले सुधीर मिश्रा या चित्रपटासाठी तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचा समृद्ध अनुभव घेऊन येत आहेत. त्यांना वो मंजिल तो नहींसाठी सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शकाचा, धारावीसाठी सर्वोत्कृष्ट हिंदी फीचर फिल्मचा आणि मैं जिंदा हूंसाठी सामाजिक विषयावरील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने दीर्घकाळानंतर



त्यांचे थिएट्रिकल रिलीजसह मोठ्या पडद्यावर पुनरागमनही होणार आहे. आता हे दोन्ही दिग्गज फिल्ममेकर आपल्या खास क्रिएटिव्ह दृष्टिकोनाला एकत्र आणत भारताच्या स्वातंत्र्याच्या काळातील सत्य घटनांवर आधारित एक महत्त्वपूर्ण कथा प्रेक्षकांसमोर घेऊन येणार आहेत.

या कथेला आणखी खास बनवतात अनेक वेळा राष्ट्रीय पुरस्कार जिंकणारे अभिनेते मनोज बाजपेयी, ज्यांची गणना आजच्या काळातील सर्वोत्तम कलाकारांमध्ये केली जाते. आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच मनोज बाजपेयी महात्मा गांधींच्या आयकॉनिक भूमिकेत दिसणार आहेत. आपल्या खास इंटेन्सिटी आणि सूक्ष्म अभिनयाच्या जोरावर ते गांधीजींचे अत्यंत मानवी आणि जवळचे रूप पडद्यावर साकारणार आहेत. या चित्रपटाच्या दमदार कलाकारांमध्ये प्रतिभावान अभिनेता सौरभ शुक्ला यांचाही समावेश आहे, जे या ऐतिहासिक काळाला पडद्यावर जिवंत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील.

चित्रपटामागील कल्पनेबद्दल दिग्दर्शक सुधीर मिश्रा म्हणाले, हा नवा चित्रपट इतिहासातील एका महत्त्वाच्या पण फारसा चर्चेत नसलेल्या भागावर लक्ष केंद्रित करतो भारताच्या स्वातंत्र्याच्या काळातील महात्मा गांधींच्या आयुष्यातील २१ दिवस. देश स्वातंत्र्याकडे वाटचाल करत असताना आणि दिल्ली सत्तेचे केंद्र बनत असताना, गांधीजींनी एक असा निर्णय घेतला, ज्याची कुणालाही अपेक्षा नव्हतीङ्गत्यांनी तिथून दूर जाण्याचा निर्णय घेतला. पण तिथून दूर जाणे म्हणजे त्यांच्यासाठी माघार घेणे नव्हते. त्यांनी स्वतः ला नव्या रूपात घडवले. इतिहासाची पुस्तके त्या काळातील घटनांची वरवरची माहिती देतात, पण ही कथा त्या प्रसिद्ध निर्णयामागील खरी कारणे आणि गांधीजींच्या त्या वैयक्तिक प्रवासाचे दर्शन घडवेल, ज्यामध्ये ते स्वतः चा मार्ग नव्या पद्धतीने ठरवत होते.

दोन दिग्गज फिल्ममेकर एकत्र येत असून, त्यांच्यासोबत दमदार कलाकारांची मजबूत फळी असल्याने हा चित्रपट एक खास सिनेमॅटिक अनुभव ठरण्यास सज्ज आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या भव्य आणि ऐतिहासिक काळाला एका अत्यंत वैयक्तिक आणि मानवी कथेशी जोडणारा हा महत्त्वाकांक्षी चित्रपट प्रेक्षकांना भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील त्या अध्यायाकडे नव्या, अधिक जवळच्या आणि भावनिक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी देईल, ज्याबद्दल त्यांना वाटत होते की ते आधीपासूनच सर्वकाही जाणतात. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुधीर मिश्रा करत असून, मनोज बाजपेयी आणि सौरभ शुक्ला महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. चित्रपटाची निर्मिती अनुभव सिन्हा आणि नरेंद्र हिरावत यांनी केली आहे. हा बनारस मीडिया वर्क्सचा प्रोडक्शन असून, एनएच स्टुडिओज या चित्रपटाचे सादरीकरण करत आहे.

# 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त 'ज्येष्ठ नागरिक आदरभाव' परिसंवाद ज्ञानसत्र संपन्न

नाशिक, दि. २२ (प्रतिनिधी) – ऑगस्ट २०२६ रोजी, साजऱ्या होणाऱ्या 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त 'ज्येष्ठ नागरिक आदरभाव' या विषयावर परिसंवाद ज्ञानसत्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडीओवर विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची संकल्पना व प्र–कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार २३ वे ज्ञानसत्र घेण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या ज्ञानसत्राचे समन्वयन व सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन यांनी केले.

२१ ऑगस्ट रोजी संपूर्ण जगात साजऱ्या होत असलेल्या 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त' सदर परिसंवाद घेण्यात आला. ज्ञानात्मक समाजनिर्मितीसाठी ज्येष्ठ नागरिकांचे जीवनातील विविध पैलू यश अपायश स्थिरता इत्यादी संचित दायित्वाचा आदरभाव विचाराची प्रगल्भता आणि



सन्मान यातून व्यक्त होतो असे प्रतिपादन सर्वच ज्ञानसत्र परीसंवादाकानी केले. त्याच बरोबर सल्लगाराची भूमिका आणि पारंपारिक संवाद आत्मविश्वास इत्यादीचे संचीतही ज्येष्ठ नागरिकांकडे असते त्याचे कुटुंबाबरोबरच समाजानेही लाभ घ्यावेत. या परिसंवादात प्रथम परिसंवादक डॉ . सचिन पोरे यांनी 'ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व समाजाने घ्यावयाची काळजी' या विषयावर विचार व्यक्त केले. तर द्वितीय परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी 'ज्येष्ठ नागरिकांचे हक्क : सन्मानाची खरी कसोटी' या विषयावर विचार मांडले तर तृतीय परिसंवादक डॉ. वासुदेव राऊत यांनी 'ज्येष्ठ नागरिकांचे शिक्षण आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची भूमिका' या विषयावर विचार मांडले.

हा कार्यक्रम अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी https://avc.ycmou.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जयदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर, श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचा अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक तसेच सर्व नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दिपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलता, पीडितांबाबत संवेदनशीलता प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असावे-विजया रहाटकर

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या 'शक्ती व सुरक्षा' कार्यक्रमांतर्गत सायबर गुन्ह्यांविरोधात पोलिसांची क्षमतावृद्धी कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- महिलांची सुरक्षा हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा विषय नसून, सुशासनाचा महत्त्वाचा निकष आहे. पीडित महिलेचे म्हणणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता शांतपणे ऐकावे आणि तिच्या सन्मानाची काळजी घ्यावी. गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबताना पीडितांबाबत कमाल संवेदनशीलता राखणे, हे प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र पोलिसांच्या वतीने आयोजित 'शक्ती व सुरक्षा' कार्यक्रमांतर्गत सायबर गुन्ह्यांविरोधात पोलिसांची क्षमतावृद्धी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. याप्रसंगी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती साधना जाधव, राज्याच्या महिला गुन्हे प्रतिबंधक विभागाच्या विशेष पोलीस महानिरीक्षक शारदा राऊत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह व समन्वयक सर्वेश पांडे आदी उपस्थित होते.

श्रीमती रहाटकर म्हणाल्या की, केवळ तक्रार स्वीकारून किंवा एफआयआर नोंदवून पोलिसांचे कर्तव्य संपत नाही. पीडित महिलेला वन स्टॉप सेंटर, संरक्षण अधिकारी व मोफत कायदेशीर मदतीची माहिती देऊन संबंधित यंत्रणांशी जोडून द्यावे. पोलीस, संरक्षण अधिकारी, महिला व बालविकास विभाग आणि इतर यंत्रणांमध्ये समन्वय वाढवावा.

त्या पुढे म्हणाल्या की, तक्रारदार महिलेबाबत कोणताही पूर्वग्रह ठेवू नये. तिला पुरेसा वेळ देऊन तिचे म्हणणे मध्येच न तोडता ऐकून घ्यावे.



आघातामुळे घटनेचा क्रम सांगताना पीडितेला अडचण येऊ शकते. त्यामुळे घाईघाईने निष्कर्ष काढू नयेत. सन्मानपूर्वक वागणुकीतून तिचा पोलिसांवरील विश्वास वाढतो.

बदलत्या काळानुसार गुन्ह्यांचे स्वरूपही बदलत आहे. सायबर गुन्हे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून होणारी फसवणूक, बनावट चित्रफिती आणि डिजिटल आर्थिक फसवणुकीसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी पोलिसांनी तंत्रज्ञान, माहिती आणि वैज्ञानिक पद्धतींचा प्रभावी वापर करावा. महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती देणेही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक तक्रार गांभीर्याने घेऊन तपास निष्पक्षपणे व वेळेत पूर्ण करावा. 'सुरक्षित महिला म्हणजे सक्षम समाज आणि सक्षम समाज म्हणजे सक्षम राष्ट्र,' हे सूत्र लक्षात घेऊन सर्व यंत्रणांनी एकत्रित काम करावे. महाराष्ट्र पोलीस महिलांना न्याय देण्यासाठी प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जैन म्हणाले की, पीडित महिला पोलीस ठाण्यात येते तेव्हा पोलीस हे तिच्यासाठी सरकारचे पहिले द्वार असतात. त्यामुळे महिलांचे म्हणणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता संवेदनशीलतेने ऐकावे. तक्रारीस विलंब झाला म्हणून प्रश्न उपस्थित करू नयेत आणि बळजबरीने तडजोड करण्याचा प्रयत्न करू नये.

प्रत्येक प्रकरणात भक्कम पुरावे गोळा करून कायदेशीर कर्तव्य पार पाडावे. त्याचबरोबर पीडितेचा सन्मान राखून तिला आवश्यक आधार द्यावा. पोलिसांची संवेदनशील वागणूक पीडितेच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम करू शकते. महिलांच्या सन्मानाची व सुरक्षेची संस्कृती पुढे नेणे आवश्यक आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी खंबीरपणे कर्तव्य बजावताना संवेदनशीलताही जपावी. संवेदनशीलता ही प्रभावी व व्यावसायिक पोलीसिंगची ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

पवार म्हणाले की, डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांचा प्रभावी तपास करण्यासाठी पोलिसांची तांत्रिक क्षमता वाढविणे आवश्यक आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी तपासाच्या आधुनिक पद्धतींचा प्रभावी वापर करावा. त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांच्या पीडितांना तातडीने मदत मिळण्यासाठी सक्षम आणि तत्पर प्रतिसाद व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

सायबर गुन्ह्यांचा तपास करताना तांत्रिक कौशल्याबरोबरच पीडितांशी संवेदनशीलतेने संवाद साधणे महत्त्वाचे आहे. पीडितांना योग्य आधार देऊन त्यांच्या गरजा समजून घेणारी पीडित-केंद्रित कार्यपद्धती पोलिसांनी स्वीकारावी. यामुळे पोलीस व्यवस्था अधिक जबाबदार, व्यावसायिक व नागरिकाभिमुख होण्यास मदत होईल. या प्रशिक्षणातून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व संवेदनशील पोलीसिंग अधिक सक्षम होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात श्रीमती राऊत म्हणाल्या की, या कार्यशाळेचा मुख्य उद्देश वाढत्या सायबर गुन्ह्यांचा प्रभावी तांत्रिक तपास व दोषसिद्धीचे प्रमाण वाढविणे हा आहे. तसेच, पोलिसांमध्ये पीडित-केंद्रित संवेदनशील दृष्टिकोन रुजवून सक्षम आणि तत्पर प्रतिसाद प्रणाली निर्माण करणे, यावर या उपक्रमांतर्गत विशेष भर देण्यात आला आहे. या कार्यशाळेस छत्रपती संभाजीनगर (शहर आणि ग्रामीण), जालना, धाराशिव, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर आणि रेल्वे पोलीस दलातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. तसेच सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा आणि महिला मदत कक्षातील (भरोसा सेल) १५० पोलीस अधिकारी आणि २०० पोलीस अंमलदार या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.

# आरोग्य सुविधांचा प्राधान्यक्रम निश्चित करा-पालकमंत्री संजय शिरसाट

## जिल्हा एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची बैठक

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये द्यावयाच्या आरोग्य सुविधांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा. ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी पुरेसा निधी उपलब्ध केला जाईल, असे निर्देश पालकमंत्री तथा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

जिल्हा एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. आ.प्रशांत बंब, आ.अनुराधा चव्हाण, आरोग्य सभापती अनिता मोटे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ कमलाकर मुदखेडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बडे यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी व समितीचे सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणाला प्राधान्य द्यावे. शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (घाटी) सुविधांमध्ये निधीच्या माध्यमातून सुधारणा करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांमध्येही आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी नियोजन करावे. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच योग्य उपचार मिळाल्यास शहरातील रुग्णालयांवरील ताणही कमी होईल.

आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि अन्य आवश्यक कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यास ती दूर करण्यासाठी योग्य नियोजन करावे. आवश्यकतेनुसार कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ उपलब्ध करण्याची प्रक्रिया राबविताना निविदेतील अटी व शर्ती काटेकोर आणि दर्जेदार असाव्यात. सेवा गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री श्री. शिरसाट यांनी दिले.




आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध मनुष्यबळाचा पूर्ण क्षमतेने उपयोग झाला पाहिजे. नागरिकांच्या आरोग्य सेवेच्या कामांमध्ये दिरंगाई किंवा निष्काळजीपणा होणार नाही, याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असेही त्यांनी निर्देश दिले.

प्रत्येक तालुक्यातील आरोग्य यंत्रणेने आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थांची वस्तुस्थिती तपासावी. प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरुस्ती, नवीन इमारतींची आवश्यकता, वैद्यकीय उपकरणे, मनुष्यबळ तसेच अन्य पायाभूत सुविधांपैकी कोणत्या बाबी तातडीच्या आहेत, याचा तालुकानिहाय प्राधान्यक्रम तयार करून सादर करावा. त्यानुसार निधीचे नियोजन करण्यात येईल, असे श्री. शिरसाट यांनी सांगितले.

जिल्ह्यातील आरोग्य सुविधांच्या विकासासाठी उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीचा प्रभावी वापर करण्याच्या सूचनाही श्री. शिरसाट यांनी दिल्या. विविध कंपन्या व बँकांच्या सीएसआर निधीतून आरोग्य संस्थांमध्ये आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. आवश्यकतेनुसार संबंधित संस्थांना नियमानुसार परवानगी देऊन त्यांच्या माध्यमातून दर्जेदार कामे वेळेत पूर्ण करण्याच्या शक्यता तपासाव्यात, असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक कामे, निधीची आवश्यकता, मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांचा सविस्तर आराखडा तयार करावा. येत्या दहा दिवसांत यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेऊन निधीचे नियोजन आणि ग्रामीण आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणाचा सविस्तर आढावा घेतला जाईल, असे श्री. शिरसाट यांनी सांगितले.

'सक्षम आरोग्य संस्था : गुणवत्तापूर्ण सेवा, समाधानी नागरिक' हा केंद्रबिंदू ठेवून जिल्ह्यातील आरोग्य संस्थांनी पूर्ण क्षमतेने कार्य करावे. नागरिकांच्या आरोग्यविषयक तक्रारींचे तातडीने निराकरण करून राष्ट्रीय व राज्यस्तरीय आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, असे निर्देशही शिरसाट यांनी दिले.

# बामसेफ व राष्ट्रीय मूलनिवासी संघाचे महाराष्ट्र राज्य अधिवेशन आज छत्रपती संभाजीनगरात



छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- बामसेफ व राष्ट्रीय मूलनिवासी संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य अधिवेशन२०२६ चे आयोजन रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात राज्यभरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विचारवंत, महिला प्रतिनिधी, विद्यार्थी तसेच बहुजन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती बामसेफचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. संजय गायकवाड यांनी दिली.

या अधिवेशनाच्या आयोजनासंदर्भात आज, दि. २२ ऑगस्ट रोजी सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. संजय गायकवाड यांनी अधिवेशनाची सविस्तर माहिती पत्रकारांना दिली. पत्रकार परिषदेस मनोज लोहे, सौ. सुजाता चौदांते, सौ. ज्योती मिसाळ, रिटायर्ड एसीपी रियाज़ देशमुख, संतोष साळवे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अधिवेशनाचे आयोजन राजयोग लॉन्स, मंगल कार्यालय, चिनार गार्डनच्या बाजूला, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे करण्यात आले आहे. प्रसिद्ध आंबेडकरी शाहिर मा. शाहिर संभाजी भगत हे अधिवेशनाचे उद्घाटक असून, बामसेफचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. वामन मेश्राम हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि बहुजन चळवळीतील मान्यवर वक्ते व पदाधिकारी विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

सध्याच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि घटनात्मक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अधिवेशनात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर विचारमंथन करण्यात येणार आहे. महिलांच्या प्रश्नांचे समाधान संघटन उभारणीशिवाय शक्य आहे का, यावर स्वतंत्र चर्चा होणार आहे.

तसेच २०२७ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय जनगणनेत ओबीसींची जातनिहाय जनगणना रोखण्यामागे सत्ताधारी वर्गाचा कोणता डाव आहे, या प्रश्नावरही चर्चा केली जाणार आहे. पूना करारामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी समाजाला स्वतंत्र मतदारसंघाच्या अधिकारापासून वंचित करण्यात आले का?, याचाही ऊहापोह अधिवेशनात होणार आहे.

निवडणूक प्रक्रियेशी संबंधित ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट हा विषयही अधिवेशनातील महत्त्वाचा मुद्दा असणार आहे. ईव्हीएम लोकशाहीसाठी मारक ठरू शकते का, निवडणूक आयोगाकडून ईव्हीएम ची पूर्व-पडताळणी अर्थात मॉक पोल केली जाते; मात्र निवडणुकीनंतर व्हीव्हीपॅट पडताळणी का केली जात नाही, या प्रश्नांवर स्वतंत्र सत्र आयोजित करण्यात आले आहे.

याशिवाय शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी), नीट परीक्षा, शिक्षणातील गुणवत्तेचा प्रश्न आणि बहुजन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संधींवर होणारा परिणाम यावरही विचारविनिमय करण्यात येणार आहे. दूध उत्पादक संघटनांचे जाळे उभारणे आणि व्यापक संघटनात्मक आंदोलनाची गरज या विषयांवरही अधिवेशनात चर्चा होणार आहे.

आरक्षणाच्या लाभार्थी जाती समूहांमध्ये अंतर्गत भांडणे लावून आरक्षणाच्या मूळ संकल्पनेचे नुकसान करण्याचे प्रयत्न होत असल्याच्या मुद्द्यावरही अधिवेशनात चर्चा होणार आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांची आजच्या परिस्थितीत असलेली उपयुक्तता या विषयावरही विचारमंथन केले जाणार आहे.

अधिवेशनातील विविध सत्रांमध्ये सामाजिक आणि बहुजन चळवळीतील अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत. यामध्ये डॉ. विजय मुन, मिलिंद टिपणीस, सुरेश खोपडे, उत्तम सोनकांबळे, हरविंदर सिंग खालसा, जनार्दन जंगले, डॉ. सूरज पवार, डॉ. त्र्यंबक कदम, डॉ.डी.आंबाडे, डॉ. अनिलकुमार माने, प्रा. डॉ. राजेश करपे, प्रा. डॉ. संजय दाभाडे, प्रा. डॉ. प्रकाश कांबळे आणि प्रा. डॉ. मोहन मिसाळ यांचा समावेश आहे. अधिवेशनाच्या विविध सत्रांमध्ये महिला संघटनांच्या प्रतिनिधींसह बहुजन, आदिवासी, ओबीसी, विद्यार्थी, कामगार आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधीही सहभागी होणार आहेत.

देशातील सध्याच्या सामाजिक, राजकीय आणि घटनात्मक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बहुजन समाजाने संघटित होऊन आपल्या अधिकारांबाबत जागरूक होणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व, आरक्षण, शिक्षण, जनगणना, निवडणूक प्रक्रिया आणि संघटनात्मक बांधणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर व्यापक जनजागृती आणि विचारमंथन घडवून आणणे हा अधिवेशनाचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य बामसेफ व सर्व सहयोगी संघटनांच्या वतीने आयोजित या अधिवेशनास बहुजन समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे, असे आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले.

# एआयच्या माध्यमातून महिलांनी सक्षमीकरणाची नवी संधी साधावी-विजया रहाटकर

## 'यशोदा एआय' उपक्रमांतर्गत 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला' या विषयावरील क्षमता बांधणी कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- एआयच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, रोजगार, व्यवसाय व दैनंदिन जीवनात प्रगती करण्यासाठी नवी साधने उपलब्ध होत आहेत. महिलांनी एआयचे स्वरूप समजून घेऊन त्याचा योग्य वापर करावा. उपलब्ध संधींचा लाभ घेऊन एआयला सक्षमीकरणाचे साधन बनवावे, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'यशोदा एआय' उपक्रमांतर्गत 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला' या विषयावरील क्षमता बांधणी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह, उपसचिव डॉ. पद्मश्री बेनाडे, उपायुक्त कृष्णा राठोड, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी कोमल कोरे, व्याख्याते उन्मेष जोशी, स्मिता कासार आदी उपस्थित होते.

श्रीमती विजया रहाटकर म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्याची बाब नसून वर्तमानातील




गरज आहे. महिलांचे डिजिटल सक्षमीकरण, सुरक्षितता व आत्मविश्वास वाढविणे हा 'यशोदा एआय' उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. माहिती संकलन व विश्लेषण, आरोग्य सेवा, तपास प्रक्रिया तसेच दैनंदिन प्रशासकीय कामांना एआयमुळे गती मिळू शकते. कामाच्या स्वरूपानुसार एआयचा योग्य पद्धतीने वापर करणे आवश्यक आहे.

महिला उद्योजक व बचत गटातील महिलांनीही एआयचा उपयोग व्यवसायवृद्धीसाठी करावा, व्यवसायासाठी प्रभावी संदेश तयार करणे, समाजमाध्यमांवर प्रचार करणे तसेच व्यवसायाशी संबंधित सर्जनशील साहित्य तयार करण्यासाठी एआयची मदत घेता येते. महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती असणे आवश्यक असून बालविवाह आणि कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ यांसारख्या समस्यांविरोधात संघटितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

गृहिणींच्या दैनंदिन कामातही एआय उपयुक्त ठरू शकतो, मुलांना अभ्यासातील अवघड विषय सोप्या पद्धतीने समजावून घेण्यासाठी, घरातील कामांचे नियोजन करण्यासाठी तसेच विविध माहिती मिळविण्यासाठी एआयचा वापर करता येतो. एआयचा वापर करताना स्वतःची विचारशक्ती कायम ठेवावी, गोपनीयतेचे संरक्षण करावे व तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

डिजिटल सुरक्षिततेबाबत महिलांनी अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे. छायाचित्रांमध्ये फेरफार, डीपफेक, आवाजाची नक्कल, ऑनलाइन फसवणूक, सायबर छळ, बनावट खाती आणि वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांपासून सावध राहण्याचे त्यांनी आवाहन केले. प्रत्येक महिलेला कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलभूत माहिती असणे हे आता जीवनकौशल्याचा एक भाग बनले आहे. 'एआय सखी'च्या माध्यमातून एक महिला एआय शिकून इतर महिलांना त्याचे ज्ञान देईल आणि अशा प्रकारे डिजिटल सक्षमीकरणाची साखळी देशभर निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जैन म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार संगणकाच्या तुलनेत अत्यंत वेगाने होत आहे. संगणकाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनण्यासाठी २० ते ३० वर्षे लागली होती, तर कृत्रिम बुद्धिमत्तेने अल्पावधीतच आपल्या जीवनावर प्रभाव निर्माण केला आहे. या तंत्रज्ञानातील धोके समजून घेऊन सुरक्षिततेची काळजी घेणे, विशेषतः महिलांनी सायबर तंत्रज्ञानाची माहिती घेऊन सक्षम होणे गरजेचे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून हुबेहूब आवाज व चित्रफिती तयार करून फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे अशा आवाजावर किंवा चित्रफितीवर तत्काळ विश्वास न ठेवता त्याची खात्री करणे आवश्यक आहे. आभासी जगातील सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी तंत्रज्ञानाची माहिती व आवश्यक दक्षता महत्त्वाची आहे. 'यशोदा एआय' उपक्रमातील मार्गदर्शन महिलांना सक्षम करण्यास उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले.

येडगे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे साधन आहे. त्याचा उपयोग दैनंदिन कामे सुलभ करण्याबरोबरच महिला सुरक्षेसाठीही करता येऊ शकतो. तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध असून कृत्रिम बुद्धिमत्ता सहज वापरता येणारे तंत्रज्ञान आहे. त्यामुळे महिलांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा आत्मविश्वासाने वापर करून स्वतःला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सक्षम करावे.

प्रास्ताविकात श्रीमती आवाडे म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता हे महिलांच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे साधन असून महिलांनी त्याचा सकारात्मक वापर करून आपली प्रगती व उज्ज्वल भवितव्य घडवावे. 'यशोदा एआय' उपक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थिनी, गृहिणी, उद्योजिका तसेच प्रौढ महिलांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या या बदलत्या युगात महिलांनी त्याचा आत्मविश्वासाने स्वीकार करून ज्ञान, कौशल्य व आर्थिक सक्षमीकरणासाठी त्याचा उपयोग करावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी महिलांनी दैनंदिन वापरात एआयचा कसा उपयोग करायचा, याविषयी स्मिता कासार तसेच सायबर सुरक्षा विषयावर उन्मेष जोशी, 'पॉश' जनजागृती विषयावर दिपाली श्रीवास्तव आणि डिजिटल मार्केटिंग विषयावर शिवम गर्ग यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार प्रदान

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील योगदानाबद्दल द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेचा एमिनेंट इंजिनियर' हा राष्ट्रीय पुरस्कार अमरावती येथे शुक्रवारी (दि. २१) राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनाचे अमरावती येथे शुक्रवारी (दि.२१) उद्घाटन झाले. या अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर विचारमंथन झाले. सायंकाळच्या सत्रात 'आयईआय'च्या वतीने जाहीर झालेला एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण पोटे, आमदार प्रवीण तायडे, द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्सचे (भारत) अध्यक्ष मनिष कोठारी, पदाधिकारी आनंद जवंजाळ, राम विघे, आर. आर. तंवर, सुनील राठी आदींची उपस्थिती होती.

'अभियंता हे देशाच्या जडणघडणीचे शिल्पकार आणि मानवी प्रगतीचे शिलेदार आहेत. भारताच्या अभियंत्यांनी अफाट कौशल्याच्या जोरावर जगात अव्वल स्थान निर्माण केले आहे. जगातील सर्वोत्तम अभियंते भारतात आहेत. विद्युत क्षेत्रातील अभियंत्यांची अद्भूत कार्यक्षमता ऊर्जामंत्री म्हणून काम करताना मी जवळून अनुभवली आहे. एलिफंटा बेटासारख्या दुर्गम ठिकाणी समुद्रामधून भूमिगत वाहिनीद्वारे वीज पोहोचवण्याचे अशक्यप्राय आव्हान महावितरण व महापारेषणच्या अभियंत्यांनी लिलया पेलले. हा प्रकल्प म्हणजे भारतीय अभियांत्रिकीच्या कौशल्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे!' अशा शब्दांत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभियंत्यांचा सन्मान केला.

याआधीच्या सत्रात संचालक राजेंद्र पवार यांनी विकसित भारत २०४७ चे ऊर्जा उद्दिष्ट: आधुनिक ऊर्जा सुलभतेचा आराखडा आणि महाराष्ट्राची आघाडी' या विषयावर सादरीकरणाद्वारे माहिती दिली.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**NOTICE INVITING e-TENDER**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 3000066693 | "Bi-yearly work contract for Housekeeping, cleaning, Water Supply, electrical maintenance, vehicle maintenance, Marathi typing, along with misc. allied works at various sections of Vaitarna Division for F.Y. 2025-26 & F.Y. 2026-27" | 7782322.14 | 81323.22 |

**Tender Cost :** Rs. 1180.00
**Contact Person :** Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185 / 2810485
For further details visit our Website : **https://eprocurement.mahagenco.in**
1. All interested vendors are requested to register to our website for e-tender : **https://eprocurement.mahagenco.in**
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

**Superintending Engineer, REC Ghatghar**



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**NOTICE INVITING e-TENDER**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 3000066691 | Approval Note for Refloat of for "Bi-yearly work contract for Housekeeping, cleaning and intake operational activities at 60 MW Vaitarna HPS and 1.5 MW Vaitarna Dam Toe HPS for F.Y. 2025-26 & F.Y. 2026-27" | 7646987.22 | 79969.87 |

**Tender Cost :** Rs. 1180.00
**Contact Person :** Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185 / 2810485
For further details visit our Website : **https://eprocurement.mahagenco.in**
1. All interested vendors are requested to register to our website for e-tender : **https://eprocurement.mahagenco.in**
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

**Superintending Engineer, REC Ghatghar**